# राज्य माहिती आयोग
# महाराष्ट्र

## चौथा वार्षिक अहवाल, २००९

कालावधी

दिनांक १ जानेवारी २००९ ते ३१ डिसेंबर २००९

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५

## अनुक्रमणिका


| अनुक्रमांक (१) | तपशील (२) | पृष्ठ क्रमांक (३) |
|---|---|---|
| **प्रास्ताविक** | | (५) |
| | **प्रकरण १** | |
| १. | महाराष्ट्र आणि माहितीचा अधिकार | १ |
| | **प्रकरण २** | |
| | **सार्वजनिक प्राधिकरणाने केलेल्या कार्यवाहीबाबत** | |
| २.१. | माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या अंमलबजावणीबाबत सार्वजनिक प्राधिकरणाने केलेल्या कार्यवाहीबाबत. | ४ |
| २.२. | सार्वजनिक प्राधिकरणामध्ये पदनिर्देशित केलेले जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी | ४ |
| २.३. | प्रशिक्षण व जनजागृती | ४ |
| | **प्रकरण ३** | |
| | **सार्वजनिक प्राधिकरणाकडे माहिती दर्शविण्यासाठी प्राप्त झालेल्या अर्जाविषयी माहिती** | |
| ३.१. | सार्वजनिक प्राधिकरणाकडे माहिती मिळणेसाठी प्राप्त झालेल्या अर्जाविषयी माहिती | ५ |
| ३.२. | अर्जदार यांना माहिती उपलब्ध करुन दिलेबाबतची माहिती | ५ |
| ३.३. | अर्जदारांना उपलब्ध करुन दिलेल्या माहितीपोटी जमा झालेली रक्कम | ५ |
| ३.४. | दारिद्र्यरेषेखालील लाभार्थ्यांची संख्या | ५ |
| | **प्रकरण ४** | |
| ४.१. | माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली द्वितीय अपीले | ६ |
| ४.२. | माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १८ अन्वये दाखल झालेले तक्रार अर्ज | ६ |
| ४.३. | माहितीचा अधिकार अधिनियम.२००५ मधील तरतुदीनुसार कार्यवाही न केलेल्या जन माहिती अधिकारी यांना केलेली शास्ती | ६ |
| | **प्रकरण ५** | |
| | माहितीचा अधिकार अधिनियम.२००५ ची सार्वजनिक प्राधिकरणाकडून प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी केलेल्या शिफारशी | ७ |
| | **परिशिष्ट** | |
| विवरणपत्र क्र. १ | .. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांची मंत्रालय विभागनिहाय माहिती | १२ |
| विवरणपत्र क्र. २ | .. जन माहिती अधिकाऱ्याकडे माहितीसाठी प्राप्त झालेल्या माहिती अर्जाचा एकत्रित गोषवारा दर्शविणारे विवरणपत्र | १४ |
| विवरणपत्र क्र. २ अ | .. खुद्द मंत्रालयीन विभागात प्राप्त झालेल्या माहिती अर्जाचा तपशील दर्शविणारे विवरणपत्र | १६ |

## अनुक्रमणिका—(समाप्त.)


| अनुक्रमांक (१) | तपशील (२) | पृष्ठ क्रमांक (३) |
|---|---|---|
| विवरणपत्र क्र. २ ब .. | संचालनालय/आयुक्तालय तसेच विभागीय स्तरावरील कार्यालयात प्राप्त झालेल्या माहिती अर्जाचा तपशील दर्शविणारे विवरणपत्र | १८ |
| विवरणपत्र क्र. २ क .. | जिल्हास्तरीय कार्यालयात प्राप्त झालेल्या माहिती अर्जाचे जिल्हावार तपशील दर्शविणारे विवरणपत्र | २० |
| विवरणपत्र क्र. २ ड .. | महानगरपालिका स्तरावर प्राप्त झालेल्या माहिती अर्जाचा तपशील दर्शविणारे विवरणपत्र | २२ |
| विवरणपत्र क्र. २ ई .. | महामंडळांच्या स्तरावर प्राप्त झालेल्या अर्जाचा तपशील दर्शविणारे विवरणपत्र | २४ |
| विवरणपत्र क्र. ३ .. | अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे प्राप्त झालेल्या अपीलांवर करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती | २८ |
| विवरणपत्र क्र. ४ .. | आयोगाचे एकूण कामकाज | ३० |
| विवरणपत्र क्र. ४ अ .. | कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेल्या द्वितीय अपीलांची माहिती दर्शविणारे विवरणपत्र | ३१ |
| विवरणपत्र क्र. ४ ब .. | कलम १८ अन्वये प्राप्त झालेल्या तक्रारींची माहिती दर्शविणारे विवरणपत्र | ३२ |
| विवरणपत्र क्र. ४ब (१) .. | कलम १८ व १९(३) अन्वये निकाली काढलेल्या तक्रारी व अपीले यांची एकत्रित संख्या | ३३ |
| विवरणपत्र क्र. ४ क .. | आयोगाकडे प्राप्त झालेल्या इतर अर्जांची माहिती दर्शविणारे विवरणपत्र | ३४ |
| विवरणपत्र क्र. ५ .. | जन माहिती अधिकाऱ्यांना लादलेल्या शास्तीबाबतचे एकत्रित विवरणपत्र | ३५ |
| विवरणपत्र क्र. ५(१) .. | विवरणपत्र क्र. ५ अन्वये दिलेल्या आकडेवारीचा तपशील | ३६ |
| विवरणपत्र क्र. ५ अ .. | विभागीय चौकशीबाबतच्या शिफारशींची आकडेवारी दर्शविणारे विवरणपत्र | ४६ |
| विवरणपत्र क्र. ६ .. | राज्य मुख्य माहिती आयुक्त व राज्य माहिती आयुक्त यांच्या नियुक्तीची माहिती | ४७ |

# प्रास्ताविक

केंद्र सरकारचा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा देशामध्ये १२ आक्टोबर २००५ पासून लागू करण्यात आला. म्हणजेच या कायद्याची अंमलबजावणी सुरु होऊन सव्वा चार वर्षापेक्षा जास्त कालावधी आता लोटलेला आहे. महाराष्ट्र राज्यात राज्याचा स्वत:चा माहिती अधिकाराचा कायदा ऑगस्ट, २००३ सालापासून होता व त्यामुळे या राज्यातील जनतेने अशा कायद्याचे महत्व व परिणामकारकता ही आधीच जाणलेली होती. महाराष्ट्र राज्याच्या कायद्याच्या तरतुदीची सर्वत्र प्रशंसा केली गेली होती व याचा परिणाम म्हणून की काय केंद्र सरकारच्या कायद्यामध्ये महाराष्ट्र सरकारच्या कायद्याच्या बऱ्याच तरतुदी जशाच्या तशा घेतलेल्या आहेत.

मा. अण्णा हजारे यांनी राज्यसरकारने अशा पद्धतीचा कायदा करावा यासाठी नेटाने केलेले प्रयत्न, राज्याचा व केंद्राचा कायदा लागू झाल्यानंतर त्यांनी केलेले राज्यव्यापी दौरे याचाही माहितीचा अधिकाराच्या अंमलबजावणीवर विलक्षण प्रभाव पडलेला आहे व त्यामुळेही महाराष्ट्रातील जनतेचा केंद्रीय कायद्याला मिळालेला प्रतिसाद हा प्रचंड असाच आहे.

सन २००६ साली १,२३,००० अर्ज, सन २००७ साली ३,१६,००० अर्ज व सन २००८ साली ४,१६,०९० तर २००९ साली ४,४०,७२८ अर्ज राज्यामध्ये प्राप्त झालेले आहेत. देशातील मोठ्या राज्यांमध्ये सुद्धा एक लाखापेक्षा कमी अर्ज येतात. आंतरराष्ट्रीय क्षेत्रात ब्रिटनमध्ये ९०,००० व मेक्सिकोमध्ये १,२५,००० अशी अर्जांची संख्या पाहता किंवा केंद्र सरकारकडील अंदाजे साडेतीन लाख अर्जांची संख्या पाहता महाराष्ट्रीय जनतेने या कायद्याला दिलेला प्रतिसाद हा विलक्षण वाटतो.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ या नागरिकाभिमुख कायद्याने पाचव्या वर्षात पदार्पण केले आहे. या कायद्यातील कलम २५अन्वये राज्य माहिती आयोगावर त्या वर्षातील अंमलबजावणीबाबतचा अहवाल सादर करणे व संनियंत्रण करणे याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. ही जबाबदारी केवळ संख्यात्मक विवरण देण्यापुरती मर्यादित नाही. कलम २५ (३) (च) व कलम २५ (३)(छ) नुसार, सार्वजनिक प्राधिकरणांनी, अधिनियमाच्या अंमलबजावणीसाठी केलेल्या प्रयत्नांची माहिती देणे आवश्यक आहे. तसेच माहिती अधिकाराच्या अंमलबजावणीसाठी किंवा या अधिनियमात सुधारणा करण्याच्या संदर्भात, सुधारात्मक उपाययोजनांच्या शिफारशी करणेही अपेक्षित आहे. या अनुषंगाने राज्य माहिती आयोगाने आपल्या अहवालात, राज्यातील सार्वजनिक प्राधिकरणांच्या कामकाजाचा चिकित्सक आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

मागील चार वर्षामध्ये या कायद्याच्या वाटचालीत अंमलबजावणी व कायद्याचा अन्वयार्थ लावणे या दोन्ही पातळ्यांवर अडचणी निर्माण झाल्या. या कायद्यानुसार निर्माण केलेल्या संस्थात्मक चौकटीच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीचा हा कालखंड होता. त्यामुळे अंमलबजावणीच्या पातळीवर शासकीय अधिकाऱ्यांमध्ये अंगभूत असलेली गोपनीयतेची मानसिकता, हा मोठा अडथळा होता. तसेच अनेक व्यवस्थात्मक अडथळे देखील होते. या अडथळ्यांवर मात करण्याच्या दृष्टीने यापूर्वीच्या वार्षिक अहवालात, या आयोगाने केलेल्या शिफारशीनुसार राज्य शासनाने काही धोरणात्मक निर्णय घेतले आहेत व सकारात्मक वाटचाल सुरु आहे. कायद्यातील तरतुदींचा अन्वयार्थ स्पष्ट होण्याच्या दृष्टीने देखील, हा कालखंड महत्वाचा ठरला आहे. उच्च न्यायालय व माहिती आयोग यांनी दिलेल्या निर्णयांमुळे कायद्यातील काही तरतुदींविषयीची स्पष्टता वाढली आहे. नागरिकांकडून विविध विषयांवर विचारले जाणारे प्रश्न, जन माहिती अधिकाऱ्यांकडून केली जाणारी अर्जांची हाताळणी, प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांकडून दिला जाणारा प्रतिसाद आणि माहिती आयुक्तांकडून दिले जाणारे निर्णय या प्रत्येक टप्प्यावर निर्माण होणाऱ्या अडचणी व त्यावर केली जाणारी मात, या कायद्याच्या विकासात महत्वाची भूमिका बजावत आहे.या कायद्याच्या विकासाच्या दृष्टीने हा कालावधी अल्प असला तरी शासन यंत्रणेच्या मानसिकतेला अंशत: का होईना सकारात्मक दिशेने बदलण्याच्या बाबतीत हा काळ अत्यंत मोलाचा ठरला आहे. माहितीचा अधिकार हा नागरिकाला शासनप्रक्रियेत सहभागी होण्यास मदत करीत असल्यामुळे सर्व सामान्य नागरिकाला

हा कायदा आपला कायदा वाटत आहे. यामुळेच प्रत्येक वर्षी अर्जांची, तक्रारींची संख्या चढत्या क्रमाने वाढत आहे. नागरिकांचा हा विश्वास कायम ठेवण्याचा प्रयत्न राज्य माहिती आयोगाने वेळोवेळी केला आहे.

माहितीचा अधिकार कायदा हा नागरिकाभिमुख कायदा असल्यामुळे पारदर्शकता, उत्तरदायित्व व लोकसहभाग यांचा त्रिवेणी संगम आपल्याला या कायद्यात आढळतो. या कायद्यामुळे प्रशासन,नागरी सेवा,माध्यमे,स्वयंसेवी संस्था व इतर सर्वच समाजघटकांनी, वरील त्रिसुत्री जीवनमूल्ये म्हणून स्वीकार करण्याची गरज आहे. या जीवनमूल्यांच्या साहाय्याने सुप्रशासनाकडे वाटचाल सुरु राहणार आहे. माहितीचा अधिकार आता केवळ प्रशासकीय सुधारणेपुरताच मर्यादित राहिला नाही, तर तो घटनात्मक मूलभूत हक्क व व्यापक अर्थाने महत्वाचा मानवी हक्क (Human Right) म्हणून प्रस्थापित झाला आहे. खुलेपणा व पारदर्शकता हे आता परवलीचे शब्द झाले आहेत. माहिती देणे हा नियम व नाकारणे हा अपवाद हे सूत्र आता रुजू लागले आहे. याबरोबरच अन्यायाचा प्रतिकार व भ्रष्टाचाराला शह या गुणांचे प्रमाणही नागरिकांमध्ये वाढत चालले आहे. भ्रष्टाचारावर अंकुश ठेवण्यात या कायद्याला काही प्रमाणात यश मिळाले आहे. ही अंशतः झालेली प्रगती काही कमी नाही. तसेच,शासकीय,निमशासकीय व शासकीय मदत घेणाऱ्या खाजगी संस्थांना, सार्वजनिक प्राधिकरणाच्या व्याख्येत समाविष्ट करुन, या कायद्याने पारंपारिक प्रशासनिक उतरंड नाकारली आहे. या कायद्यामुळे नागरिकांमध्ये असणारी हतबलतेची व हताशतेची भावना काही प्रमाणात कमी व्हायला मदत होत आहे. लोकप्रतिनिधींना व शासकीय अधिकाऱ्यांना, त्यांचा कामाचा जाब आपण विचारु शकतो, ही सुखावह जाणीव नागरिकांमध्ये निर्माण झाली. या कायद्याने तरुण, वृद्ध, सेवानिवृत्त अशा अनेकांना समान व्यासपीठ उपलब्ध करुन दिले आहे. चळवळीची पारंपारिक व्याख्याच बदलून टाकण्याची क्षमता या कायद्यामध्ये आहे. अनेक स्वयंसेवी संस्था, सजग नागरिक, या कायद्याच्या सहाय्याने शासकीय धोरणाला लोकहितकारी वळण देण्याचा प्रयत्न करत आहेत. नव्या प्रबोधन युगालाच या कायद्याने सुरुवात करुन दिली आहे, असे म्हणावे लागेल.

ही नवचळवळ अधिक व्यापक करण्यात माहिती तंत्रज्ञान क्षेत्राचाही महत्वाचा वाटा आहे. आंतरजाल (इंटरनेट), विविध संकेत स्थळे (वेबसाईटस),अनुदिनी (ब्लॉग्ज) यांच्या माध्यमातून हा कायदा साक्षर वर्गापर्यंत पोहोचत आहे. माहितीच्या अधिकाराची अटळता आता स्वीकारली जात आहे. माहिती तंत्रज्ञानामुळे जग जवळ आले आहे. अशा वेळी अन्य प्रगत देशातील प्रशासकीय कार्यपद्धतीची ओळख सहजगत्या होऊ लागली आहे. प्रशासनाचे संगणकीकरण हे या प्रगत देशांचे वैशिष्टय आहे. माहितीचे अधिकाधिक होणारे संगणकीकरण हे माहिती अधिकार कायद्याला पुरक आहे. यामुळे ई-गव्हर्नन्सलाही अधिकाधिक महत्व प्राप्त होत आहे. या कायद्यातील कलम ४ (क) नुसार, प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाने आपल्या अभिलेखांचे संगणकीकरण करणे आवश्यक आहे. तसेच,असे अभिलेख विविध प्रणालीमध्ये नेटवर्क मार्फत जोडले जात आहेत याची खातरजमा करणे आवश्यक आहे. तरच माहितीच्या अधिकाराची प्रभावी अंमलबजावणी होऊ शकेल. प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाने कलम ४ (ख) नुसार १७ मुद्यातील माहिती स्वयंप्रेरणेने जाहीर करण्याची तरतूद आहे. ही माहिती सतत अद्ययावत ठेऊन इंटनेटसह, संपर्काच्या विविध साधनांव्दारे जाहीर करणे अपेक्षित आहे. या दृष्टीने आयोगाने सतत पाठपुरावा चालू ठेवला आहे. जर सार्वजनिक प्राधिकरणांनी अशी माहिती सतत अद्ययावत करुन जारी केली तर, माहिती अधिकार अर्जांची हाताळणी सक्षमतेने करता येईल.कलम ४ ची प्रभावी अंमलबजावणी केल्यास नागरिक सार्वजनिक प्राधिकरणाच्या कार्यपद्धतिशी परिचित होतील. माहितीच्या आदान प्रदानाचे खुले पर्व निर्माण होईल, मानसिकता बदलेल, शासकीय कार्यालयाभोवतीचे गूढ वातावरण निवळण्यास मदत होईल. कलम ४ चे महत्व लक्षात घेऊन माहिती आयोगाने अनेक उपक्रम राबवले आहेत. यशदाने देखील प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये कलम ४ चा समावेश केला आहे. हे काम सर्वत्र सारख्याच पद्धतीने पूर्ण झाले आहे असे म्हणता येणार नाही. काही सार्वजनिक प्राधिकरणांनी उल्लेखनीय काम केले आहे. तर बहुतांश शासकीय कार्यालयांनी या बाबीकडे नेहमीच्या पद्धतीने औपचारिक पूर्तता म्हणून पाहिले आहे. ते या कायद्याच्या उद्देशाशी तसेच पारदर्शकता व अद्ययावत माहितीचे सततचे प्रसारण (Dissemination) या मूलतत्त्वाशी सुसंगत नाही. याबाबतीत आणखी सुधारणेची गरज आहे.

ई-गव्हर्नन्स बरोबरच माहितीचा अधिकार कायद्याला पूरक.परंतु काही दुर्लक्षित विषयांकडे लक्ष वेधले गेले आहे. या कायद्यामुळे अभिलेख व्यवस्थापनासारखा अत्यंत महत्वाचा विषय, प्रकाशात आला आहे.माहितीच्या प्रकटीकरणाप्रमाणेच अभिलेख व्यवस्थापनाचा माहितीच्या अधिकाराशी अन्योन्य संबंध आता स्पष्ट होत आहे. माहिती अधिकार कायद्यातील कलम ४ (क) मध्ये अभिलेख सूचिबद्ध करण्याचे, तसेच त्यांची निर्देशसूची तयार करण्याचे आ-बंधन सार्वजनिक प्राधिकरणांवर घातले आहे. गेल्या चार वर्षाच्या वाटचालीवरुन असे दिसून येते की, माहिती अधिकार कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी अभिलेख व्यवस्थापन ही एक पूर्वअट आहे. माहिती अर्जाच्या वाढत्या संख्येबरोबर अभिलेख व्यवस्थापनाची अपरिहार्यता शासकीय यंत्रणेच्या लक्षात येऊ लागली आहे. या दृष्टीने अभिलेख व्यवस्थापनाकडे अधिकाधिक लक्ष देण्याचा प्रयत्न माहिती आयोगाने केला आहे. अभिलेख व्यवस्थापन हा आता कळीचा मुद्दा झाला आहे. त्यामुळे अभिलेख व्यवस्थापनाचा विषय आता प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये समाविष्ट करण्यात आला आहे. या दृष्टीने राज्य शासनाने महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५ व त्याखालील नियम, २००७ ही अभिलेख व्यवस्थापनाची कायदेशीर चौकट उपलब्ध करुन दिली आहे. आता वरील कायद्याचे संनियंत्रण करणाऱ्या पुराभिलेख विभागाचे देखील मजबुतीकरण करणेगरजेचे आहे.

तसेच कलम ४ प्रमाणे करावयाच्या स्वयंस्फुर्तीच्या प्रकटनाला पूरक म्हणून " महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन " आणि " शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५" या कायद्यातील प्रकरण तीन मध्ये नागरिकांच्या सनदेची, पर्यवेक्षणाचे स्तर ठरविण्याची व विहित कालावधीतच प्रत्येक शासकीय काम पूर्ण करण्याची तरतूद केली आहे. विलंब झाल्यास शास्तीचीही तरतूद करणेत आली आहे. हे सर्व कायदे एकत्रित वाचल्यास राज्यात सुशासनाची प्रक्रिया सुलभ करणारी कयदेशीर व्यवस्था उपलब्ध करण्यात आलेली आहे.

या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी पहिल्या टप्प्यात संस्थात्मक संरचना तयार करण्यात आली होती. राज्य माहिती आयोगाने हा कायदा अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी, संस्थात्मक संरचनेचा विस्तार म्हणून, शासनाने विभागीय स्तरावर खंडपीठांची निर्मीती केली आहे. असे करणारे महाराष्ट्र हे देशातील एकमेव राज्य आहे. माहिती आयुक्त आपापल्या विभागांमध्ये अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहोचण्यासाठी जिल्हा स्तरावर जाऊन अपील निर्णय देत आहेत. याचाच एक भाग म्हणून मी नाशिक विभागातील १२०० च्या आसपास अपीलांच्या सुनावण्या जिल्हापातळीवर (धुळे, जळगांव, नाशिक) येथे घेतल्या आहेत.

दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे अपीलांची सुनावणी व्हिडिओ कॉन्फरसिंगद्वारे घेण्याचा आयोगाने उपक्रम सुरू केला आहे. सन २००९ मध्ये राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई यांनी व्हिडिओ कॉन्फरसींगद्वारे ९१३ अपीलांची सुनावणी घेतली. याची विभागावर विगतवारी खालीलप्रमाणे :—

| | | |
|---|---|---|
| पुणे विभाग | .. | २७४ अपीले |
| औरंगाबाद विभाग | .. | ३९० अपीले |
| नागपूर विभाग | .. | १७३ अपीले |
| अमरावती विभाग | .. | ७६ अपीले |
| **एकूण** | .. | **९१३ अपीले** |

व्हिडिओ कॉन्फसरींगमध्ये अपीलार्थी त्यांच्या विभागाच्या मुख्यालयी शासनाच्या व्हिडिओ कॉन्फरसींग रुममध्ये उपस्थित राहतात व मुंबईस्थित अधिकारी आयोगाच्या व्हिडिओ कॉन्फरसींग रुममध्ये राज्य माहिती आयुक्त यांच्या समक्ष उपस्थित राहतात. यामुळे अपीलार्थी, शासकीय अधिकारी यांची सोय होते. तसेच वेळ व खर्चाची बचत होते.

वरील प्रयत्नानंतरही हा कायदा, दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती, अल्पसंख्यांक, स्त्रियां, अनुसूचितजाती व इतर मागासवर्गीय इत्यादी वर्गापर्यंत पोहोचला आहे असे म्हणता येणार नाही. यासाठी विशेष प्रयत्न करणे गरजेचे आहे.

या कायद्याच्या वाटचालीच्या निमित्ताने माहिती अधिकाराच्या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या आढावा घेणेही आवश्यक आहे. महाराष्ट्रातील माहिती अधिकाराच्या प्रशिक्षण कार्यक्रमाची जबाबदारी ही यशदावर सोपविण्यात आली आहे. यशदा या संदर्भात " राज्य अंमलबजावणी संस्था " म्हणून काम करत आहे. यशदाने गेल्या चार वर्षात एकूण ३५,५५२ शासकीय कर्मचारी व अधिकारी यांना प्रशिक्षण दिले आहे. राज्य माहिती आयोगाने सुचविल्यानुसार यासाठी राज्य शासनाने यशदाला निधी उपलब्ध करून दिला आहे. या चार वर्षात बदलत्या परिस्थितीनुसार, यशदाने आपल्या प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये बदल केले आहेत. अभिलेख व्यवस्थापन व कलम ४ चा प्रशिक्षण कार्यक्रमात केलेला अंतर्भाव, हा या बदलाचाच भाग आहे.

अभ्यासक्रमातसुद्धा माहितीच्या अधिकाराचा समावेश व्हावा यासाठी माहिती आयोग प्रयत्नशील आहे.

दिनांक १ जानेवारी २००९ ते ३१ डिसेंबर २००९ या कालावधिचा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या अंमलबजावणीचा अहवाल सादर करतांना मला अतिशय आनंद होत आहे.

**डॉ. सुरेश विनायकराव जोशी,**

मुख्य माहिती आयुक्त,

महाराष्ट्र राज्य.

प्रकरण - १

## महाराष्ट्र आणि माहितीचा अधिकार

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंमलात आल्यानंतर सलग चौथ्या वर्षीही माहिती-मागणीचे अर्ज, प्रथम अपिले व राज्य माहिती आयोगाकडील अपिले यांचे प्रमाण वाढत आहे. या कायद्याबाबत विविध व्यक्ती/संस्था/संघटनांकडून होत असलेला प्रसार व प्रचार, सर्वसामान्य नागरिकांमध्ये त्याबाबतची वाढती जागृती आणि अर्ज व अपिलांद्वारे प्रश्न मार्गी लागण्याची उदाहरणे यामुळे या कायद्याच्या वापराचे प्रमाण वाढत असल्याचे दिसते. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चा वापर करण्यात महाराष्ट्र हे देशात प्रथम क्रमांकाचे राज्य ठरत आले आहे. तीच स्थिती या वर्षीही कायम आहे.

महाराष्ट्रात राज्य मुख्य माहिती आयुक्त डॉ. सुरेश जोशी यांच्या व्यतिरिक्त श्री.विलास भागवत पाटील (नागपूर), श्री. विजय बाबुराव बोरगे (मराठवाडा / नाशिक), श्री. विजय विश्वनाथ कुवळेकर (पुणे), श्री. नवीनकुमार (कोकण), श्री. रामानंद तिवारी (मुंबई) व ॲड. भास्कर त्रि. पाटील (अमरावती) असे राज्य माहिती आयुक्त कार्यरत आहेत. नाशिक विभागासाठी स्वतंत्र माहिती आयुक्तांची नियुक्ती अद्याप व्हावयाची आहे.

ऑक्टोबर, २००५ ते डिसेंबर, २००८ या काळात टप्प्याटप्प्याने झालेल्या राज्य माहिती आयुक्तांच्या नियुक्त्या, तोपर्यंतच्या प्रलंबित अपिलांमध्ये नव्याने दाखल होणाऱ्या अपिलांची भर, प्रारंभीच्या काळातील अपुरा कर्मचारीवर्ग व अपुऱ्या कार्यालयीन सुविधा यामुळे प्रलंबित राहिलेल्या अपिलांचा परिणाम निपटाऱ्यावर होणे स्वाभाविक आहे. तसेच प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या पातळीवर अद्यापही अपिलांची निर्गत समाधानकारक पद्धतीने व योग्य प्रमाणात होत नसल्यामुळे आयोगाकडे येणाऱ्या अपिलांचे प्रमाण वाढते, असे अपिलांच्या विश्लेषणावरून दिसून येते. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी म्हणून अधिकाधिक कनिष्ठ कर्मचाऱ्यांकडे काम सोपविण्याचे प्रमाण वाढत आहे. वरिष्ठ पातळीवरील अधिकारी या जबाबदारीतून मोठ्या प्रमाणावर बाजूला होत आहेत, असे निरीक्षण आयोगाने गेल्या वर्षीच्या अहवालात नोंदवून त्याबाबत चिंता व्यक्त केली होती. तथापि, या परिस्थितीत सुधारणा होण्याऐवजी हीच प्रक्रिया आणखी विकेंद्रीकरणाच्या दिशेने वाटचाल करीत असल्याचे गेल्या वर्षभरातील चित्र आहे. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी या पातळीवर माहितीच्या अधिकार कायद्यानुसार अपेक्षित व परिणामकारक कार्यवाही होण्यात याचा अडसर येतो. परिणामी राज्य माहिती आयोगाकडील अपिलांचे प्रमाण वाढते. माहितीच्या अधिकार कायद्याची प्रभावी अंमलबजावणी होण्यास ही परिस्थिती मारक आहे, याचा पुनरूच्चार या वर्षीही करावा लागत आहे. याची दखल घेऊन शासनाने उपाययोजना करणे आवश्यक आहे.

याच बरोबर आणखी एका बाबीचा उल्लेख मागील वर्षीच्या अहवालात आयोगाने केला होता. एकाच अर्जात अनेक खात्यांशी/विभागाशी/सार्वजनिक प्राधिकरणांशी संबंधित अशा विषयांची व अनेक मुद्दयांची माहिती मागणे, एकाच विषयावर एकाच व्यक्तीने अनेक अर्ज व अपिले करणे याचाही परिणाम अपिलांची संख्या वाढण्यात व निर्गतीवर होत आहे. एकाच व्यक्तीने १०० पेक्षा जास्त अपिले करण्याची उदाहरणे आयोगाच्या विविध खंडपीठांच्या कार्यक्षेत्रात आढळून येत आहेत. तसेच दारिद्र्यरेषेखालील व्यक्तींना माहिती निःशुल्क देण्याची कायद्यात असलेली सवलत वापरून शेकडो पानांची माहिती दारिद्र्यरेषेखालील व्यक्तीच्या नावे मार्गावण्याचे प्रकारही वाढत आहेत. अशा तक्रारी वाढत असल्याचे गेल्या दोन वर्षांमध्ये प्रकर्षाने जाणवत आहे. आयोगाच्या दुसऱ्या व तिसऱ्या वार्षिक अहवालात याचा उल्लेख करण्यात आला आहे. अशा तक्रारींमुळे कायद्याची परिणामकारकता कमी होते, कायद्याबद्दलचे व संबंधित यंत्रणांबद्दलचे गैरसमज वाढतात, नागरिक व शासकीय कर्मचारी यांच्यातील भ्रष्ट शक्तींचे फावते, ही बाब चिंतेची आहे. आपल्याला सोयीचे नसणारे अर्ज व अपिले करणाऱ्या व्यक्तींवर सरसकट गैरवापराचा शिक्का मारण्याची प्रवृत्तीही याचा फायदा उठवते. या दोन्ही बाबी कायद्याचा मूळ हेतू साध्य होण्यास पोषक नाहीत. या कायद्याच्या गैरवापराला आळा घालणे स्वयंसेवी संस्था, नागरिक, शासकीय कर्मचारी / अधिकारी यांच्या विधायक प्रयत्नानेच शक्य आहे. ते होणे महत्त्वाचे व आवश्यक आहे. तसे झाले नाही तर, खरेखुरे वैयक्तिक किंवा

सार्वजनिक हिताचे प्रश्न गांभीर्याने मांडू पाहणाऱ्या नागरिकांना अप्रत्यक्षरीत्या रास्त प्राधान्यक्रमापासून वंचित रहावे लागण्याची भिती आहे. हे लक्षात घेऊन, आयोगाने शासनाला केलेल्या सूचनांची अंमलबजावणी आणि जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्या पातळीवर अर्ज व अपिलांच्या निपटाऱ्यात अधिक पारदर्शकता, कार्यक्षमता व गतिमानता येणे गरजेचे आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ४ ची अंमलबजावणी हा या कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीच्या व सार्वजनिक कारभारातील स्वयंस्फूर्त पारदर्शकतेच्या दृष्टीने विशेष महत्त्वाचा भाग आहे. दिनांक १२ ऑक्टोबर २००५ रोजी हा कायदा अस्तित्वात आला, तेव्हा कलम ४ च्या अंमलबजावणीसाठी १२० दिवसांची मुदत देण्यात आली होती. त्याच्या कितीतरी पटीने मुदत उलटून गेली तरी अद्याप बहुसंख्य सार्वजनिक प्राधिकरणांमध्ये या कलमाची पूर्णांशाने अंमलबजावणी झालेली नाही. कर्मचारी / अधिकाऱ्यांची नावे, कामाचे स्वरूप इत्यादीसारखा ढोबळ तपशील दिला जातो. परंतु त्या त्या वेळी सार्वजनिक प्राधिकरणांतर्फे घेतल्या जाणाऱ्या निर्णयांची त्वरित परिपूर्ण माहिती देण्यासारख्या सातत्याने करावयाच्या अधिक व्यापक महत्त्वाच्या बाबींकडे बव्हंशी दुर्लक्ष केले जात असल्याचे दिसून येते. कलम ४ ची परिपूर्ण अंमलबजावणी झाल्यास अर्जांचे व अपिलांचे प्रमाण कमी होते, असा अनुभव आहे. अधिकाधिक माहिती व अभिलेख अर्ज/अपिलांशिवायही नागरिकांना सहजतेने उपलब्ध झाले पाहिजेत. त्यामुळे याबाबत राज्य शासनाने सर्व सार्वजनिक प्राधिकरणांना ठराविक मुदतीचे बंधन घालून पूर्तता करावयास लावली पाहिजे व त्यानुसार कार्यवाही न करणाऱ्या सार्वजनिक प्राधिकरणांच्या प्रशासकीय प्रमुखांवर कडक कारवाई करण्याचे पाऊल उचलले पाहिजे.

सांगली-मिरज-कुपवाड, पुणे व सोलापूर या तीन महानगरपालिकांमध्ये या दृष्टीने काही पावले टाकण्यात आली आहेत. सोलापूर महानगरपालिकेत दर महिन्यातून एकदा 'माहिती अधिकार दिन' साजरा केला जातो. महिनाभरातील प्रलंबित अर्ज व अपिलांचा आढावा घेऊन विहित मुदतीतील अंमलबजावणीचा प्रयत्न त्या दिवशी नागरिक, स्वयंसेवी संस्था व कर्मचारी / अधिकारी यांच्या समन्वयाने केला जातो. सांगली-मिरज-कुपवाड व पुणे या दोन महानगरपालिकांमध्ये आठवड्यातून एक दिवस ठराविक तास पूर्वनियुक्ती न घेता वा अर्ज न करता कोणतेही अभिलेख अवलोकनासाठी खुले ठेवले जातात. नागरिकाला आवश्यक असलेल्या अभिलेखांच्या प्रती अवलोकनानंतर अर्ज व अन्य प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर दिल्या जातात. तसेच वरिष्ठ पातळीवर अर्ज व अपिले याबाबत दरमहा आढावा घेतला जातो. अभिलेख अवलोकनाच्या कायद्यातील तरतुदींव्यतिरिक्तची ही सुविधा आहे. महानगरपालिकेच्या विविध विभागांमध्ये समन्वयासाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे. पुणे महानगरपालिकेने माहितीचा अधिकारविषयक ग्रंथालय व अन्य उपक्रमांसाठी सन २००९-२०१० च्या अर्थसंकल्पात पंचवीस लाख रूपयांची तरतूद केली आहे. माहितीचा अधिकार कायद्याच्या अंमलबजावणीसाठी अशा प्रकारे अर्थसंकल्पीय तरतूद करणारे हे देशातील बहुधा पहिले सार्वजनिक प्राधिकरण असावे.

शासकीय कार्यालयांमध्ये अभिलेख्यांची परिस्थिती फारशी समाधानकारक नाही, असे गेल्या चार वर्षांत आयोगाच्या निदर्शनास आले आहे. कायमस्वरूपी जतनाचे असलेले अभिलेखही अनेक कार्यालयांमध्ये आढळत नाहीत. काही गावांचे वर्षानुवर्षाचे जमिनीविषयीचे सर्व अभिलेख उपलब्ध नसल्याची उदाहरणे आहेत. परिणामी अर्जदाराला / अपीलकर्त्याला हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती व माहिती तत्परतेने मिळत नाही. अनेक वर्षांचे हे अभिलेख असल्यामुळे ते उपलब्ध न होणे आपला दोष नाही, असे विद्यमान कर्मचारी / अधिकारी यांचे म्हणणे असते. काही ठिकाणी गेल्या दोन-चार वर्षांमधीलही आणि तेही काही प्रकरणांमधीलच अभिलेख उपलब्ध नसल्याचे सांगितले जाते. त्यामुळे माहितीच्या अधिकारात प्राप्त होणे आवश्यक असलेली कागदपत्रे नागरिकांना मिळत नसल्याचे व पर्यायाने आवश्यक माहिती डावलली जात असल्याचे लक्षात घेऊन शासनाने ( अ)अभिलेखांचे योग्य पद्धतीने जतन करणे व पूर्वीच्या कागदपत्रांची त्यानुसार वर्गवारी आणि नोंद करणे हे काम त्वरेने हाती घेऊन विशिष्ट मुदतीत पूर्ण करणे आवश्यक आहे. (ब) जतनाच्या कालावधीनुसार उपलब्ध होणे आवश्यक असलेले अभिलेख (अगदी अलीकडच्या काळातीलही) मिळत नाहीत, अशा बाबतीत महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५ चा अवलंब करून संबंधित कर्मचारी/अधिकारी यांच्याविरूद्ध फौजदारी गुन्हा नोंदविण्यासह आवश्यक ती कारवाई केली पाहिजे.

कायदा अस्तित्वात आल्याला चार वर्षे होऊन गेली असली, तरी अद्यापही व्यापक प्रमाणावर नागरिकांपर्यंत हा कायदा पोहोचला आहे, असे दिसत नाही. तसेच शासकीय कर्मचारी/अधिकारी यांच्यामध्येही त्याबाबतच्या जबाबदारीचे पूर्ण भान आलेले दिसत नाही. माहितीच्या अधिकारात न येणाऱ्या प्रशासकीय कार्यवाहीच्या मागण्या करणारे अर्ज करणे, अर्जापेक्षा अतिरिक्त माहिती प्रथम व द्वितीय अपिलात करणे, पुनः पुन्हा त्याच विषयाची तीच माहिती मागणे, अर्जाला/अपिलाला विहित शुल्क न जोडणे व आवश्यक कागदपत्रांची त्यासोबत पूर्तता नसणे अशासारख्या अनेक बाबी अद्यापही निदर्शनास येतात. जन माहिती अधिकाऱ्यांनी व अपिलीय प्राधिकाऱ्यांनी विहित मुदतीत अर्जांवरील कार्यवाही न करणे, अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी न होणे, माहिती देण्यास विलंब झाला असल्यास अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अपील निर्णयात त्याबाबतचा अभिप्राय न नोंदविणे अशा बाबी सार्वजनिक प्राधिकरणाच्या पातळीवर अजूनही आढळतात.

सार्वजनिक हिताच्या विषयांपेक्षा व्यक्तिगत स्वरूपाचे प्रश्न, अडीअडचणी, कामे याबाबतच्या अर्जांचे प्रमाणच मोठे आहे, असे गेल्या तीन वर्षांप्रमाणेच याही वर्षातील अपिलांमधून स्पष्ट होते. अर्थात सर्वसामान्य नागरिकाला ' प्रश्न मार्गी लावण्याचे एक महत्त्वाचे साधन ' असा हा कायदा वाटत असल्यामुळे ते स्वाभाविकही आहे. माहिती अधिकाधिक खुली होत जाईल व माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये अपेक्षित असलेली सार्वजनिक कारभारातील पारदर्शकता वाढत जाईल, तसे हे प्रमाण व स्वरूप बदलेल, अशी अपेक्षा आहे.

कायदा नवीन आहे व अंमलबजावणीची ही पहिली पाच वर्षे आहेत. काही बाबींची स्पष्टता व प्रथांची निश्चितता हळूहळू होते आहे. विधायक दृष्टी असणाऱ्या नागरिकांचे, संस्था संघटनांचे या कामी सहकार्य लाभते आहे. तसेच शासनाचा दृष्टीकोनही सकारात्मक आहे. अपिलांच्या वेगाने निपटाऱ्याबाबत आयोगही सातत्याने प्रयत्नशील व प्रयोगशील आहे. अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्या एकत्र विचारविनिमयातून अपिले निकाली निघत असल्यास पाहण्याचा 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम,' किंवा जिल्हा पातळीवर अपिलांची सुनावणी करण्याचा उपक्रम हा याचाच भाग आहे.

महाराष्ट्रात राज्य माहिती आयोगाकडे अपिले दाखल होण्यात मुंबई, मराठवाडा व पुणे या विभागातील संख्या सर्वाधिक आहे.

पुणे विभागाकडे प्रलंबित असणाऱ्या अपिलांचे प्रमाण लक्षात घेता, सुमारे तीनशे अपिले कोकण विभागाच्या राज्य माहिती आयुक्तांकडे तसेच अमरावती विभागाची ३०० अपीले नागपूर विभागाकडे वर्ग करण्याचे एक पाऊल आयोगाने या वर्षात उचलले. अशाच प्रकारे अन्य खंडपीठांबाबतही पूरक प्रयत्न करून प्रलंबित अपिलांची संख्या व अपिले प्रलंबित राहण्याचा कालावधी कमी करण्याचा आयोगाचा प्रयत्न आहे.

शासकीय कर्मचारी / अधिकारी यांच्याप्रमाणेच नागरिकांमध्येही या कायद्याच्या प्रशिक्षणाचे प्रमाण वाढण्याची गरज आहे. त्या दृष्टीने जन माहिती अधिकारी, अपिलीय प्राधिकारी व नागरिक यांच्याकरिता कार्यशाळा आयोजित करण्यासाठी केंद्र शासनाने राज्य माहिती आयोगाला रूपये तीन लाख पन्नास हजार अनुदान मंजूर केले होते. गेल्या वर्षभरात आयोगाने यशदामार्फत अनेक कार्यशाळा यशस्वीपणे पार पाडल्या. तथापि शासनाबरोबरच विविध स्वयंसेवी संस्था-संघटना यांनीही अशा प्रशिक्षणाचे उपक्रम हाती घेतल्यास उपयुक्त ठरेल. काही संस्था व व्यक्ती त्यात क्रियाशील आहेत. शासकीय पातळीवर केवळ जन माहिती अधिकारी, सहायक माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्यापुरतेच हे प्रशिक्षण मर्यादित न राहता सर्वच शासकीय कर्मचाऱ्यांना या कायद्यानुसार येणाऱ्या जबाबदारीची व त्यातील उद्दिष्टांची परिपूर्ण कल्पना व भान असणे आवश्यक आहे. त्यासाठी शासनाच्या पातळीवर मुदतबद्ध कार्यक्रम ठरवून व्यापक प्रमाणावर प्रशिक्षण देण्याची गरज आहे.

प्रकरण क्रमांक - २

## सार्वजनिक प्राधिकरणाने केलेल्या कार्यवाहीबाबत

२.१ . माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ३ अन्वये सर्व नागरिकांना अधिनियमाच्या तरतुदींना अधीन राहून माहितीचा अधिकार आहे. सार्वजनिक प्राधिकरणाकडून या तरतुदीची परिपूर्तता होण्यासाठी सार्वजनिक प्राधिकरणावर अधिनियमातील कलम ४ अन्वये आबंधने निश्चित केलेली आहेत.

सर्व सार्वजनिक प्राधिकरणे माहिती सुलभ रीतीने मिळण्यासाठी त्यांच्याकडील सर्व अभिलेख योग्य रितीने सूचीबद्ध करतील व त्याची निर्देशसूची तयार करतील व ज्याचे संगणकीकरण करणे योग्य आहे अशा सर्व अभिलेखांचे संगणकीकरण करणे आवश्यक आहे.

हा अधिनियम अधिनियमीत झाल्यापासून १२० दिवसांच्या आत राज्यातील सर्व विभागांच्या अंतर्गत असलेल्या सर्व सार्वजनिक प्राधिकरणांनी अधिनियमानुसार विहित केलेल्या १७ नमुन्यांमध्ये माहिती प्रसिद्ध केली आहे. त्यानुसार प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाची रचना,प्रक्रिया,कर्तव्ये, त्या प्राधिकरणांचे अधिकारी व कर्मचारी यांचे अधिकार, कर्तव्य, निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत उत्तरदायित्वप्रणाली निश्चित करण्यात आलेली मानके या सर्व बाबींचा समावेश झालेला आहे.

२.२. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ५ अन्वये राज्यातील सर्व सार्वजनिक प्राधिकरणांनी या अधिनियमान्वये माहिती मिळण्याची विनंती करणाऱ्या व्यक्तींना माहिती देण्यासाठी त्यांच्या अखत्यारितील सर्व प्रशासकीय कार्यालयांमध्ये राज्य जन माहिती अधिकारी पदनिर्देशित करणे आवश्यक होते. त्यानुसार एकूण ७६,७४७ राज्य जन माहिती अधिकारी यांना पद निर्देशित केलेले आहे व त्यांना सहाय्य करण्यासाठी सहाय्यक जन माहिती अधिकारी म्हणून ४८,१५१ अधिकाऱ्यांना पद निर्देशित केले आहे.

राज्य जन माहिती अधिकारी यांनी या अधिनियमाच्या तरतुदीतील प्राप्त झालेल्या अर्जावरती केलेल्या कार्यवाहीने समाधान न झाल्यास कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील दाखल करण्याची तरतूद आहे. त्यासाठी प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून सार्वजनिक प्राधिकरणांनी एकूण १९,०१६ पदे निर्देशित केलेली आहेत.

२.३. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदींची प्रभावी अंमलबजावणी व्हावी याकरिता महाराष्ट्र शासनाने राज्यातील विविध विभागांतील कार्यालयातील सहाय्यक राज्य जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांना प्रशिक्षण देण्यासाठी यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा), पुणे या संस्थेवर सुरुवातीपासूनच जबाबदारी सोपविली आहे.

## प्रकरण क्रमांक - ३

### सार्वजनिक प्राधिकरणाकडे माहिती दर्शविण्यासाठी प्राप्त झालेल्या अर्जाविषयी माहिती

३.१. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६ च्या पोटकलम १ अन्वये नागरिकांचे माहिती मिळण्यासाठीचे अर्ज राज्यातील सार्वजनिक प्राधिकरणांच्या राज्य जन माहिती अधिकारी यांच्या नावे सन २००९ यावर्षी ४,४०,७२८ एवढे अर्ज प्राप्त झाले. तसेच सन २००८ या वर्ष अखेरीस ५७,१०७ अर्ज प्रलंबित होते. अशा प्रकारे एकूण ४,९७,८३५ अर्जावर सन २००९ मध्ये माहिती देणे अपेक्षित होते. २००९ साली प्राप्त झालेल्या अर्जात माहितीचा अधिकार कायद्यामधील तरतुदींनुसार सार्वजनिक प्राधिकरणांकडे अर्ज करण्याचा कल हा नगर विकास विभागाच्या अखत्यारितील सार्वजनिक प्राधिकरणाकडे सर्वात जास्त होता. त्या विभागाकडे १,२५,४१८ अर्ज प्राप्त झाले होते. सर्वात जास्त अर्ज प्राप्त झालेल्या दहा विभागांची आकडेवारी पुढीलप्रमाणे आहे :—

| अनुक्रमांक (१) | विभागाचे नाव (२) | २००९ सालात प्राप्त झालेल्या अर्जांची संख्या (३) |
|---|---|---|
| १ | नगर विकास विभाग | १,२५,४१८ |
| २ | महसूल विभाग | ७२,३९३ |
| ३ | गृह विभाग | ४५,४७७ |
| ४ | ग्रामविकास विभाग व पंचायतराज विभाग | ४३,०५७ |
| ५ | सार्वजनिक बांधकाम विभाग | १७,२३२ |
| ६ | सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग | १३,७९७ |
| ७ | गृह निर्माण विभाग | ११,५३८ |
| ८ | वन विभाग | १०,९०१ |
| ९ | शालेय शिक्षण व क्रीडा विभाग | १०,८४१ |
| १० | जलसंपदा विभाग | १०,४४२ |
| | **एकूण** | **३,६१,०९६** |

### अर्जदार यांना माहिती उपलब्ध करुन दिलेबाबतची माहिती

३.२. २००९ सालात ४,४०,७२८ अर्ज प्राप्त झालेत व ४,३९,०६१ अर्ज करणाऱ्या व्यक्तींना मागितलेली माहिती उपलब्ध करून देण्यात आली आहे. नगर विकास विभागाने अहवाल वर्षात निकाली काढलेल्या १,२१,६८७ अर्जांपैकी १,२०,८३२ अर्जांमध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. महसून विभागाने निकाली काढलेल्या ७२,२२६ अर्जांपैकी ७०,३६१ अर्जांमध्ये माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. गृह विभागाने ५५,८०३ अर्जांपैकी ५४,२४० अर्जांमध्ये माहिती उपलब्ध करून दिली आहे. ग्राम विकास विभागाने निकाली काढलेल्या ४२,४६६ अर्जांपैकी ४२,१९१ अर्जांमध्ये माहिती उपलब्ध करून दिलेली आहे. यावरून असे स्पष्ट होते की, सार्वजनिक प्राधिकरणांतील राज्य जन माहिती अधिकाऱ्यांकडून जास्तीत जास्त नागरिकांना माहिती उपलब्ध करून दिलेली आहे.

### अर्जदारांना उपलब्ध करून दिलेल्या माहितीपोटी जमा झालेली रक्कम

३.३. राज्य जन माहिती अधिकारी यांच्यकडून अर्जदार यांना उपलब्ध करून दिलेल्या माहितीपोटी दारिद्र्यरेषेखालील अर्ज वगळून एकूण १,२३,०४ ३६१ रुपये जमा झालेले आहेत. त्यापैकी नगर विकास विभाग रुपये ७५,८८,५३४, महसूल विभाग रुपये १२,९२,८१६, सार्वजनिक बांधकाम विभाग, रुपये ४,८०,८०६, गृह विभाग रुपये ६,७३,६३३, ग्राम विकास विभाग रुपये २,२८,५२१, जलसंपदा विभाग रुपये ३,१२,७२७, गृह निर्माण विभाग रुपये ३,९०,२९८ माहितीपोटी अशी रक्कम जमा झाली आहे.

३.४. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ७ (५) खालील परंतुक अन्वये ज्या व्यक्ती दारिद्र्यरेषेखालील आहेत अशा शासनाकडून निर्धारित केलेल्या व्यक्तींकडून माहितीपोटी फी आकारली जात नाही. सन २००९ मध्ये माहिती उपलब्ध केलेल्या ४,३९,०६१ व्यक्तींपैकी १५,३२४ दारिद्र्यरेषेखालील व्यक्तींना या कलमाचा लाभ देण्यात आला आहे.

## प्रकरण क्रमांक - ४

४.१. प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने समाधान न झालेल्या व्यक्तींना कलम १९ (३) अन्वये अहवाल वर्षात सुरुवातीची शिल्लक १४,२७३ व सन २००९ मध्ये प्राप्त झालेली १८,२०५ अशी एकुण ३२,४७८ अपीले दाखल झाली होती. त्यापैकी २१,७६२ अपीले निकाली काढण्यात आली आहेत. (विवरण पत्र - ४).

४.२. राज्य जन माहिती अधिकारी यांच्याकडून या अधिनियमान्वये देण्यात आलेल्या अर्जामध्ये वेळेत निर्णय न घेणे, माहिती नाकारणे अथवा अर्ज न स्विकारणे म्हणून कलम १८ अन्वये सन २००९ या वर्षामध्ये ३,५०५ तक्रार अर्ज दाखल झाले. तसेच सन २००८ या वर्षा अखेरीस १,२०७ तक्रार अर्ज प्रलंबित होते. या एकूण ४,७१२ तक्रार अर्जापैकी २,७५७ तक्रार अर्जावर निर्णय घेण्यात आला आहे.

४.३. माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदींच्या अंमलबजावणीबाबत राज्य जन माहिती अधिकारी यांच्याकडून कसूर झाला म्हणून राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेल्या अपीलावर / तक्रारीवर निर्णय देते वेळेस अहवाल वर्षामध्ये एकूण ३४७ प्रकरणांमध्ये कलम २० अन्वये जन माहिती अधिकारी यांच्यावर रुपये २६,५७,६९१ इतक्या रकमेचे शास्तीचे आदेश पारित केले आहेत.

## प्रकरण क्रमांक ५

### राज्य माहिती आयोगाच्या ४ थ्या वार्षिक अहवालात शासनास केलेल्या शिफारसी

१. राज्य माहिती आयुक्त हे ज्यावेळेस द्वितीय अपीलाची सुनावणी घेतात, त्यावेळेस जे वादग्रस्त मुद्दे उपस्थित होतात किंवा त्रुटी निदर्शनास येतात त्यावरुन राज्य माहिती आयोगाच्या, राज्य विधान मंडळास सादर केलेल्या दुसरा वार्षिक अहवाल व तिसरा वार्षिक अहवाल यामध्ये प्रकरण ५ मधील शासनास केलेल्या शिफारशींची अंमलबजावणी आतापर्यंत झालेली दिसून येत नाही.

२. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ४ प्रमाणे बहूतांश सार्वजनिक प्राधिकरणांनी अद्याप पर्यंत माहिती ही अवलोकनासाठी त्या त्या कार्यालयांमध्ये उपलब्ध करुन दिलेली नाही अशा तक्रारी अर्जदारांकडून आयोगाकडे येत असतात. त्याबाबत शासनाने अधिनियमाच्या कलम ४ ची अंमलबजावणी सार्वजनिक प्राधिकरणांनी गंभीरपणे करणे हे बंधनकारक आहे अशा प्रकारे आदेश देणे आवश्यक आहे व त्याची पूर्तता होईल. याबाबतची खबरदारी घेणे आवश्यक आहे व तशी पूर्तता न केल्यास त्या त्या सार्वजनिक प्राधिकरणाच्या मुख्य अधिका-यांच्या विरुद्ध प्रशासकीय कारवाई करावी.

३. प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६ प्रमाणे अर्ज सहायक माहिती अधिकारी यांचेकडे दाखल करण्यासाठी आदेश काढावेत. दाखल झालेले अर्ज व माहिती उपलब्ध करुन देण्यापर्यंतची कार्यवाही पूर्ण होईपर्यंतच्या नोंदीकरीता स्वतंत्र नोंदवही ठेवणे आवश्यक आहे.

४. सहायक माहिती अधिकारी यांनी अर्ज स्वीकारुन जन माहिती अधिकारी यांचेकडे माहिती पुरविण्याबाबतच्या कार्यवाहीसाठी सादर करणे आवश्यक आहे. बऱ्याच सार्वजनिक प्राधिकरणामध्ये सहायक माहिती अधिकारी यांना किंवा संबंधित लिपीक किंवा शाखा अधिकारी यांना माहिती अधिकारी हे परस्पर माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश देतात. अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे माहिती ही जन माहिती अधिकारी यांनीच उपलब्ध करुन द्यावयाची असते.

५. प्रथम अपील हे अधिनियमाच्या कलम १९(१) प्रमाणे त्यांच्या सार्वजनिक प्राधिकरणातील वरिष्ठ अधिकारी यांचेकडे सादर करावयाचे असते. कारण त्याच सार्वजनिक प्राधिकरणाच्या स्तरावर संपूर्ण माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे. परंतु वरिष्ठ अधिकारी सुद्धा अपीलाची सुनावणी न घेता किंवा कागदपत्रांची पडताळणी न करता किंवा अपीलकर्ता यांनी अपील कोणत्या कारणाकरीता दाखल केलेले आहे याबाबतची शहानिशा न करता माहिती उपलब्ध करुन दिली आहे, अपील खारीज करण्यात येते असे आदेश देतात. जन माहिती अधिकारी यांचेवर माहिती दिली किंवा नाही हे सिद्ध करण्याची जबाबदारी असताना छाननी न करता माहिती उपलब्ध करुन द्यावी अशा प्रकारचा निर्णय देत असतात. काही सार्वजनिक प्राधिकरणात तर नोटशिटवर (कार्यालयीन टिपणीवर) प्रथम अपीलाचा निर्णय चर्चेच्या स्वरुपात केला जातो व तो अपीलकर्ता यास कळविण्यात येतोच असे नाही. त्यामुळे द्वितीय अपीलासोबत प्रथम अपीलाचा निर्णय उपलब्ध नसतो. प्रथम अपीलाच्या सुनावणीमध्ये जे सुनावणीचे पत्र पाठविले जाते त्यात, ज्यांच्या निर्णयाविरुद्ध प्रथम अपील आहे तेच जन माहिती अधिकारी हे पत्र पाठवितात. ही कार्यपद्धती नैसर्गिक न्यायाच्या तत्वाच्या दृष्टीने अयोग्य आहे. अशा अधिकाऱ्यांविरुद्ध महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र. केंमाअ-२००७/११८२/प्र. क्र. ६५/०७/६ (मा.अ.) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ दिनांक १० डिसेंबर २००७ चे उल्लंघन केल्याबद्दल प्रशासकीय कारवाई करावी.

अपीलार्थीच्या अपील अर्जावर निर्णय देताना जन अपिलीय अधिकारी यांनी अपीलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना आदेश देणे, अपीलार्थीचे अपील मान्य, अंशत: मान्य करणे, निकाली काढणे अथवा फेटाळून लावणे अशा प्रकारचे आदेश देणे आवश्यक आहे. या प्रकरणी केवळ अपीलार्थीस द्वितीय अपील करण्यास परवानगी देणे. जे अधिनियमातील तरतुदींमध्ये मूळात अस्तित्वात नाही अशा अर्थाचे द्वितीय अपीलाची परवानगी देण्याचे निरर्थक निर्णय देणे जन अपिलीय अधिकारी यांनी टाळावे व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्राप्त होणाऱ्या प्रथम अपीलावर कशा प्रकारे निर्णय द्यावेत हे सूचित करणारे परिपत्रक शासन स्तरावर त्यांना निर्गमित करावे.

६. ज्या ग्रामपंचायत क्षेत्रामध्ये वन हक्क व जलस्वराज्य समित्या ग्रामसभांमधून स्थापन केल्या असतात त्या वन हक्क व जलस्वराज्य समित्या हया त्या त्या ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रातील असतात. पण त्यावर ग्रामपंचायतीचे कोणत्याही प्रकारचे नियंत्रण नसल्यामुळे कोणत्याही प्रकारचे अभिलेख जतन केलेले नसतात व ती माहिती ही जन माहिती अधिकारी म्हणून

ग्रामसेवक यांना मागितली जाते. परंतु ग्रामसेवकाकडे ती माहिती उपलब्ध नसते व अशा प्रकारे वन हक्क व जलस्वराज्य समितीकडे असलेली माहितीही उपलब्ध होऊ शकत नाही. त्याबाबत अभिलेखे जतन करण्यासंबंधी जबाबदारीचे परिपत्रक काढणे संयुक्तिक राहील. शासनाच्या पाणीपुरवठा व स्वच्छता विभागामार्फत पार पाडण्यात येणा-या जलस्वराज्य योजनेसंदर्भात मोठया संख्येने अपीले प्राप्त होत आहेत. या योजनेच्या अमलबजावणीचे स्वरुप पाहता या योजनेशी संबंधित सर्व माहिती ग्रामीण पाणीपुरवठा समितीकडे उपलब्ध असणे अभिप्रेत असल्याचे दिसून येते. या समितीच्या अध्यक्षांसह समितीचे सर्व सदस्य खाजगी व्यक्ती असतात. या योजनेसंदर्भात माहिती मागणा-या नागरिकांचे प्रमाण बरेच आहे. हे पाहता या योजनेशी संबंधित संपूर्ण माहिती संबंधित ग्रामपंचायतीकडे कायमस्वरुपी ठेवण्याची व्यवस्था करण्यासंदर्भात व या संदर्भात ग्रामसेवकांची जन माहिती अधिकारी म्हणून नेमणूक करावी.

७. बहुतांश सार्वजनिक प्राधिकरणामध्ये अभिलेख्यांची वर्गवारी किंवा गटवारी ही योग्य रितीने केलेली नसते. तसेच कागदपत्रांच्या निंदणीकरणाच्या संदर्भामध्ये अधिकारी/ कर्मचारी यांना अभिलेख नष्ट करणे व विल्हेवाट लावणे च्या नियमांची माहिती नसते. परंतु यापुढे अभिलेख्यांची निंदणी करतांना निश्चित आदेश असणे आवश्यक आहे. जेणेकरुन अर्जदारास माहिती उपलब्ध का नाही याचे संयुक्तिक कारण देता येईल. अन्यथा जन माहिती अधिकारी हे माहिती लपवित आहे असा अर्जदाराचा समज होतो.

महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५ च्या तरतुदींचे पालन कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणात होत आहे असे आढळून येत नाही. अधिनियमाच्या तरतुदीनुसार सार्वजनिक अभिलेख्यांचे प्रशासन, व्यवस्थापन इ. चे पालन न केल्यास त्या अधिनियमाचे कलम ९ प्रमाणे शास्तीची कारवाई होणे आवश्यक आहे.

८. **सचिव, महसूल विभाग, मंत्रालय, मुंबई यांना**

राज्य शासनाच्या महसूल विभागामध्ये काही प्रकरणाच्या माहितीकरिता तलाठी यांची माहिती अधिकारी व मंडळ अधिकारी यांची जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमणूक केली गेली आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून माहिती अधिकार अधिनियमामध्ये ज्या दर्जाचे निर्णय अपेक्षित आहेत, ते पाहता अपीलार्थीच्या अशा प्रकारच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय देण्याकरीता किमान नायब तहसिलदार दर्जाचे अधिकारी जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमण्यात यावेत.

९. **सचिव, कृषि विभाग, मंत्रालय, मुंबई यांना**

कृषि विभागाच्या संदर्भा त अपीलांची सुनावणी घेत असतांना विशेषतः ज्या शेतक-यांच्या शेतात कृषि विभागांतर्गत रोजगार हमी योजनेची कामे केली जातात त्या शेतक-यांची नांवे उपलब्ध करुन न देणे आणि अर्जदारास मस्टरच्या प्रती देण्याचे शक्यतोवर टाळणे आणि अर्जदाराने अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केल्यानंतर त्या अपीलाची सुनावणी कधीही न घेता फक्त पत्राद्वारे संबंधित जन माहिती अधिकारी यांना काही सूचना देणे अशा प्रकारची प्रवृत्ती कृषि विभागामध्ये वाढीला लागल्याचे दिसून येत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीच्या अमलबजावणीच्या निकोप वाढीच्या दृष्टीने विशेषतः शासनाच्या कारभारातील पारदर्शकता स्पष्ट करण्यासाठी आता या टप्प्यावर सचिव (कृषि) यांनी वैयक्तिक लक्ष घालून आवश्यक त्या सूचना त्यांच्या विभागाच्या क्षेत्रिय अधिका-यांना एका परिपत्रकाद्वारे द्याव्यात जेणेकरुन या परिस्थितीमध्ये सुधारणा होण्यास मदत होईल.

१०. जर कृषि खात्यातर्फे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयास देण्यात येत असलेल्या आकस्मिक खर्चाच्या तरतुदीमधून माहिती देण्याबद्दल यथावकाश कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या असतील तर या सूचनांमध्ये योग्य तो बदल करुन माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास कशा प्रकारे त्वरित माहिती पुरविता येईल यादृष्टीने फलोत्पादन, पाणलोट, जलसंधारण अतिवृष्टी नुकसानभरपाई इ. आवश्यक त्या सूचना अथवा परिपत्रक आपल्या स्तरावरुन पारित करावे.

कृषि विभागाच्या प्रत्येक प्रकल्पामधील लाभार्थीची संपूर्ण माहिती ही कोणत्याही तालुका कृषि कार्यालयात संकलीत स्वरुपात उपलब्ध नसते व त्यामुळे संकलीत करुन माहिती देण्यात विलंब होतो किंवा पूर्णपणे संकलीत सुद्धा होत नाही. गटनिहाय किंवा शेतकरी निहाय लाभार्थ्यांची यादी, त्यावरील खर्च इ. ची संकलित माहिती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ४ प्रमाणे कार्यालयात उपलब्ध करुन देणे बंधनकारक आहे. त्याप्रमाणे आदेश काढून महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे अभिलेख्याचे प्रशासन व्यवस्थापन करण्याचे आदेश द्यावेत.

११. **सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना**

ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी यांची एका ठिकाणाहून बदली झाल्यानंतर त्यांनी आपला कार्यभार व त्यांच्याकडील उपलब्ध असलेले इतर अभिलेखे त्यांच्यानंतर येणा-या अधिका-याकडे कशा प्रकारे व किती कालावधीत हस्तांतरित करावे, प्राप्त झालेल्या कार्यभाराबद्दल कार्यभार घेणाऱ्या ग्रामसेवकाने त्यावर अभिप्राय नोंदविण्यासाठी निश्चित कालावधी, त्यांची नियमित दप्तर तपासणी इत्यादी संदर्भात आपल्या स्तरावरुन सर्व क्षेत्रिय कर्मचाऱ्यांना सूचना देणारे एक परिपत्रक जारी करावे.

त्याचप्रमाणे दारिद्रयरेषेखालील व्यक्तींना विनामूल्य माहिती मिळावी यासंबंधी असलेल्या कायद्यातील तरतुदीनुसार काही व्यक्ती विस्तृत स्वरुपाची माहिती मागवितात. दारिद्रयरेषेखालील व्यक्तींना प्रत्येक अर्जामागे जास्तीत जास्त ५० पृष्ठांपर्यंतची माहिती विनामूल्य देण्यात यावी.

कांही व्यक्ती त्यांना थोडीच माहिती आवश्यक असतांना खूप म्हणजे ती देण्यास विलंब होईल व त्या विलंबामुळे ती मोफत मिळू शकते म्हणून सुद्धा विस्तृत स्वरुपाची माहिती मागत असल्याचे निदर्शनास आले आहे. या परिस्थितीत अर्जदाराने एका वेळी किती माहिती मागावी याबाबत शासनाने काही मार्गदर्शक तत्वे निश्चित करणे आवश्यक आहे.

१२. **सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना**

आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की, खाजगी अनुदानित शैक्षणिक संस्था या शाळेशी संबंधित सर्व अभिलेखे स्वतःकडे (संस्थेच्या ताब्यात) ठेवतात व शासन निर्देशानुसार शाळेच्या मुख्याध्यापकांना माहिती अधिकारी म्हणून नेमण्यात येते. त्यांचेकडे माहितीची मागणी केल्यास माहिती संस्थेकडे असल्यामुळे मुख्याध्यापक ती पुरवू शकत नाहीत व अनुदानित खाजगी शैक्षणिक संस्थांना, मा. उच्च न्यायालयाने विनाअनुदानित खाजगी धर्मदाय संस्थांच्या बाबत दिलेल्या निर्णया नुसार, माहितीचा अधिकार कायदा लागू नाही या कारणास्तव माहिती देण्याची टाळाटाळ करतात. या परिस्थितीत सर्व शैक्षणिक संस्थांनी अनुदानित शाळाशी संबंधित सर्व अभिलेख मुख्याध्यापकाचे ताब्यात देण्यासंबंधी व मुख्याध्यापकांना कोणत्याही माहितीची मागणी केल्यास देण्यासंबंधीचे सर्व संबंधितांना शासन परिपत्रकांद्वारे निर्देश देण्यात यावेत व या आदेशाचे पालन न करणा-या संस्थाचालकांच्या विरुद्ध आवश्यक ती कारवाई करण्यात येईल. असेही त्या निर्णयात स्पष्ट करण्यात यावे.

१३. बहुतांश सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन माहिती अधिकारी म्हणून वरिष्ठ लिपीक/वरिष्ठ सहायक यांची नियुक्ती केली जाते. परंतु वरिष्ठ लिपीक/वरिष्ठ सहायक यांना अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे माहिती उपलब्ध करुन द्यावयाची आहे किंवा नाही याबद्दलचा निर्णय घेता येत नाही असे दिसून येते. व त्यामुळे ज्या ज्या सार्वजनिक प्राधिकरणामध्ये वर्ग २ चे अधिकारी असतील त्या प्राधिकरणामध्ये वर्ग-२ च्या अधिकाऱ्यांना जन माहिती अधिकारी म्हणून नियुक्त करणे योग्य राहील. तसेच जन माहिती अधिकारी यांची नियुक्ती झाल्यानंतर वारंवार बदल केल्यास माहिती उपलब्ध करुन दिली जात नाही. याबाबत सुद्धा शासनाने योग्य ते आदेश काढणे आवश्यक आहे.

१४. **सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई यांना**

महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, २००५ च्या नियम ४ प्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणाला देय असलेली फी, रोख रकमेच्या स्वरुपात, तिची योग्य पावती देऊन किंवा दर्शनी धनाकर्ष किंवा बँकेचा धनादेश किंवा मनिऑर्डरच्या स्वरुपात आकारण्यांत येईल अशी तरतूद आहे.छ परंतु बहुतांश अतिरिक्त खर्चाचा भरणा हा (ट्रेझरी) मध्ये करण्यास सांगितला जातो. परंतु, छायांकित प्रती देण्यासाठी प्रति प्रत रुपये २ असा खर्च असल्याने व विभागात किंवा सार्वजनिक प्राधिकरणामध्ये झेरॉक्स मशीन उपलब्ध नसल्यास माहिती अधिका-यांस छायांकित प्रतीचा खर्च करण्याची अडचण निर्माण होते. त्यामुळे रोख रकमेच्या स्वरुपात खर्चाचा भरणा स्वीकारुन छायांकित प्रतीसाठी खर्च करण्याच्या परवानगीचे आदेश वित्त विभागाकडून काढणे आवश्यक आहे. ही शिफारस पूर्वी सुद्धा करण्यात आली आहे.

१५. **सर्वसाधारण**

जन माहिती अधिका-यांनी उत्तर/ माहिती देताना व प्रथम अपिलीय अधिका-यांनी निर्णय देताना पुढील अपीलाबाबतची मुदत व अपील कोणाकडे करावे याचा तपशील देणे आवश्यक आहे. असा तपशील दिला जात नसल्याचे बऱ्याच बाबतीत दिसते.

जन माहिती अधिकारी, अपिलीय प्राधिकारी व माहिती देण्याबाबत पत्रव्यवहार करणारे संबंधित कर्मचारी/अधिकारी स्वाक्षरी करतात, परंतु त्यासोबत संपूर्ण नांव व हुद्दा नमूद करणे आवश्यक आहे.

# विवरण पत्रे

| विवरण पत्र क्रमांक - १ | | | | |
|---|---|---|---|---|
| **माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या अंमलबजावणी करिता पदनिर्देशित करण्यात आलेल्या सहायक जन महिती अधिकारी जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांची मंत्रालय विभाग निहाय माहिती** | | | | |
| अ. क्र | विभागाचे नाव | सहायक जन माहिती अधिकारी | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| १ | कृषि व पदुम विभाग (कृषि उपविभाग) | ११३७ | ११३९ | ६४१ |
| २ | कृषि व पदुम विभाग (पदुम) | २९७ | २७३ | ६१ |
| ३ | सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग | ७२२ | ७७० | १९१ |
| ४ | रोजगार व स्वयंरोजगार विभाग | ६६ | ६६ | ६४ |
| ५ | पर्यावरण विभाग | ३० | ३५ | ३५ |
| ६ | वित्त विभाग | १३३ | २६२ | १८० |
| ७ | अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग | १४९ | १४९ | २३ |
| ८ | सामान्य प्रशासन विभाग | १६३ | १८९ | ११६ |
| ९ | उच्च व तंत्र शिक्षण विभाग | ५९९७ | १००५१ | ९३३३ |
| १० | गृह विभाग | १३१९ | ९०० | ३४५ |
| ११ | गृहनिर्माण विभाग | १७६ | २०९ | ८७ |
| १२ | उद्योग, उर्जा व कामगार विभाग (उद्योग) | ३०६ | ३६१ | १२७ |
| १३ | उद्योग, उर्जा व कामगार विभाग (उर्जा) | १२२५ | १२६८ | ५४८ |
| १४ | उद्योग, उर्जा व कामगार विभाग (कामगार) | १०५ | ११७ | ४४ |
| १५ | विधी व न्याय विभाग | ३२० | ३०७ | ३०१ |
| १६ | वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग | ५४ | १४६ | ८८ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १७ | संसदीय कार्य विभाग | ५ | १ | १ |
| १८ | नियोजन विभाग | ४४ | ५३ | ५२ |
| १९ | नियोजन विभाग (रोहयो) | २७६ | २७४ | १३७ |
| २० | सार्वजनिक आरोग्य विभाग | ४४३ | ४६८ | ४४८ |
| २१ | सार्वजनिक बांधकाम विभाग | ७४१ | ६०९ | २२० |
| २२ | महसुल व वन विभाग (महसूल उपविभाग) | ७०४९ | ८८४९ | १६७५ |
| २३ | महसूल व वन विभाग (वने) | ४४६ | १४६ | ११६ |
| २४ | म्हसूल व वन विभाग (पुनर्वसन) | १२ | १२ | ५ |
| २५ | ग्रामविकास व जलसंधारण विभाग (ग्रामविकास व पंचायत राज) | २२६१९ | ४४९२० | २६६२ |
| २६ | ग्रामविकास व जलसंधारण विभाग (जलसंधारण) | ४३७ | ४६० | ८४ |
| २७ | शालेय शिक्षण व क्रिडा विभाग | ३२२ | ४४५ | ३०९ |
| २८ | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग | २१ | ६१४ | १२२ |
| २९ | आदिवासी विकास विभाग | १५३१ | १६९८ | ४८८ |
| ३० | नगर विकास विभाग | १०१४ | ११३४ | २६२ |
| ३१ | जलसंपदा विभाग | ५६० | ३८५ | ८९ |
| ३२ | पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग | २६० | २५८ | ११९ |
| ३३ | महिला व बाल विकास विभाग | १२६ | १३९ | ८ |
| ३४ | पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग | ६ | ६ | २ |
| ३५ | महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय | २७ | २७ | २५ |
| ३६ | अल्पसंख्यांक विकास विभाग | १३ | ७ | ६ |
| | एकुण | ४८१५१ | ७६७४७ | १९०१६ |

## विवरण पत्र क्रमांक - २

### जानेवारी २००९ ते डिसेंबर २००९ या कालावधीत प्राप्त झालेल्या माहिती अर्जाचा एकत्रित गोषवारा दर्शविणारे विवरणपत्र

| अ. क्र. | विभागाचे नाव | डिसेंबर २००८ अखेर प्रलंबित अर्जाची सुधारित संख्या | २००९ या वर्षी प्राप्त झालेल्या अर्जाची संख्या | २००९ या वर्षी निकाली काढलेल्या अर्जाची संख्या | निकाली काढलेल्या अर्जापैकी: माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेल्या अर्जाची संख्या | निकाली काढलेल्या अर्जापैकी: माहिती नाकारण्यात आलेल्या अर्जाची संख्या | २००९ या वर्ष अखेरीस प्रलंबित अर्जाची संख्या | २००९ या वर्षी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीपोटी जमा झालेली रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | कृषि व पदुम विभाग (कृषि उपविभाग) | २६९८ | ७६६७० | ९०९३ | ८७२८ | ३६५ | १२७५ | ७९६१८ |
| २ | कृषि व पदुम विभाग (पदुम) | ४०६ | १९८७ | २२३२ | २२१९ | १३ | १६१ | १९६२६ |
| ३ | सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग | ५५९ | १३७९७ | १३६२७ | १३०४२ | ५८५ | ७२९ | ११५७४३ |
| ४ | रोजगार व स्वयंरोजगार विभाग | २७ | ५९३ | ६०० | ५९९ | १ | २० | २४३९ |
| ५ | पर्यावरण विभाग | ६६ | ८७८ | ८५७ | ८५६ | १ | ८७ | १३५९९ |
| ६ | वित्त विभाग | २१५ | ४४२४ | ४३८२ | ४२९६ | ८६ | २५७ | २९६२५ |
| ७ | अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग | ४६० | ३३१४ | ३१५३ | ३०९७ | ५६ | ६२१ | ६६९८२ |
| ८ | सामान्य प्रशासन विभाग | ११० | ४४४१ | ४३१९ | ४१३९ | १८० | २३२ | ६६१३६ |
| ९ | उच्च व तंत्र शिक्षण विभाग | ५३९ | ८५९६ | ८६५७ | ८२३६ | ४२१ | ४७८ | १८७१०९ |
| १० | गृह विभाग | १३५८० | ४५४७७ | ५५८०३ | ५४२४० | १५६३ | ३२५४ | ६७३६३३ |
| ११ | गृहनिर्माण विभाग | १८४४ | ११५३८ | ११६५३ | ११२७५ | ३७८ | १७२९ | ३९०२९८ |
| १२ | उद्योग, उर्जा व कामगार विभाग (उद्योग) | २३३ | ३२२६ | ३२६२ | ३२०३ | ५९ | १९७ | ७४७०४ |
| १३ | उद्योग, उर्जा व कामगार विभाग (उर्जा) | ८०७ | ७४७६ | ७२९७ | ७२४७ | ५० | ९८६ | ४५९४० |
| १४ | उद्योग, उर्जा व कामगार विभाग (कामगार) | ३२१ | २८९६ | २९२९ | २९१० | १९ | २८८ | २४६३६ |
| १५ | विधी व न्याय विभाग | २०६५ | २७०६ | ४३६१ | ३५८९ | ७७२ | ४१० | ५२०८१ |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १६ | वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग | ३३२ | ४८१३ | ४७०३ | ४६६६ | ३७ | ४४२ | ७७१७४ |
| १७ | संसदीय कार्य विभाग | ० | ४० | ४० | ३७ | ३ | ० | ० |
| १८ | नियोजन विभाग | २५ | १३९ | १५६ | १४९ | ७ | ८ | १४६३ |
| १९ | नियोजन विभाग (रोहयो) | ३९ | ७५७ | ७७४ | ७५० | २४ | २२ | ५१९७ |
| २० | सार्वजनिक आरोग्य विभाग | ३४० | ३७०५ | ३७०७ | ३६८६ | २१ | ३३८ | ३६६५६ |
| २१ | सार्वजनिक बांधकाम विभाग | २१३९ | १७२३२ | १७१०२ | १६११३ | ९८९ | २२६९ | ४८०८०६ |
| २२ | महसुल व वन विभाग (महसूल उपविभाग) | [illegible],४५ | ७२३९३ | ७२२२६ | ७०३६१ | १८६५ | ५३१२ | १२९२८१६ |
| २३ | महसुल व वन विभाग (वने) | ३४९१ | १०९०१ | ११९८३ | ११४९० | ४९३ | २४०९ | २६९९८१ |
| २४ | महसूल व वन विभाग (पुनर्वसन) | २९७० | ७३४० | ७२९६ | ७१९३ | १०३ | ३०१४ | २५४२१ |
| २५ | ग्रामविकास व जलसंधारण विभाग (ग्रामविकास व पंचायत राज) | ३६१५ | ४३०५७ | ४२४६६ | ४२१९१ | २७५ | ४२०६ | २२८५२१ |
| २६ | ग्रामविकास व जलसंधारण विभाग (जलसंधारण) | ५७० | १७३८ | २१७१ | २००८ | १६३ | १३७ | १३५२९ |
| २७ | शालेय शिक्षण व क्रिडा विभाग | १०३५ | १०८४१ | १०७४३ | १०१४० | ६०३ | ११३३ | २९४३० |
| २८ | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग | ४३१ | ५०८७ | ५०१५ | ४९४४ | ७१ | ५०३ | १४२८० |
| २९ | आदिवासी विकास विभाग | ४३७ | २८८१ | २८९० | २६०० | २९० | ४२८ | २४६७८ |
| ३० | नगर विकास विभाग | १०२३४ | १२५४१८ | १२१६८७ | १२०८३२ | ८५५ | १३९६५ | ७५८८५३४ |
| ३१ | जलसंपदा विभाग | ९५० | १०४४२ | १०२६३ | ९८२९ | ४३४ | ११२९ | ३१२७२७ |
| ३२ | पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग | १२९१ | २०४३ | १९७२ | १८८४ | ८८ | १३६२ | २०६०२ |
| ३३ | महिला व बाल विकास विभाग | ७१ | १११६ | ११३३ | ११३१ | २ | ५४ | ८९६२ |
| ३४ | पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग | १९ | ३१४ | ३०८ | ३०५ | ३ | २५ | २७५४ |
| ३५ | महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय | ३६ | २३२ | २३२ | २१५ | १७ | ३६ | १२४६४ |
| ३६ | अल्पसंख्यांक विकास विभाग | ७ | १२२० | ८६२ | ८६१ | १ | ३६५ | १६२०० |
| | एकूण | ५७१०७ | ४४०७२८ | ४४९९५४ | ४३९०६१ | १०८९३ | ४७८८१ | १२३०४३६१ |

## विवरण पत्र क्रमांक - २-अ

जानेवारी २००९ ते डिसेंबर २००९ या कालावधीत खुद्द मंत्रालयीन विभागात प्राप्त झालेल्या माहिती अर्जाचा तपशील दर्शविणारे विवरण पत्र

| अ. क्र. | विभागाचे नाव | डिसेंबर २००८ अखेरीस प्रलंबित अर्जाची सुधारित संख्या | अहवालाच्या कालावधीत प्राप्त झालेल्या अर्जाची संख्या | अहवालाच्या कालावधीत निकाली काढलेल्या अर्जाची संख्या | निकाली काढलेल्या अर्जापैकी माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेल्या अर्जाची संख्या | निकाली काढलेल्या अर्जापैकी माहिती नाकारण्यात आलेल्या अर्जाची संख्या | अहवाल कालावधीच्या अखेरीस प्रलंबित अर्जाची संख्या | अहवालाच्या कालावधीत उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीपोटी जमा झालेली रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | कृषि व पदुम विभाग (कृषि उपविभाग) | ६ | २३९ | २४१ | १८३ | ५८ | ४ | ४१५० |
| २ | कृषि व पदुम विभाग (पदुम) | २६ | १६९ | १९२ | १९२ | ० | ३ | ० |
| ३ | सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग | ५० | ८२१ | ८५१ | ८५१ | ० | २० | ५४९९ |
| ४ | रोजगार व स्वयंरोजगार विभाग | २ | ९१ | ९१ | ९१ | ० | २ | ७०१ |
| ५ | पर्यावरण विभाग | २ | १५६ | १५५ | १५५ | ० | ३ | ० |
| ६ | वित्त विभाग | ६ | ४९४ | ४८७ | ४४८ | ३९ | १३ | ५८४५ |
| ७ | अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग | ८ | ३७७ | ३७२ | ३६५ | ७ | १३ | १५५८ |
| ८ | सामान्य प्रशासन विभाग | ७३ | १८१० | १७९७ | १७६४ | ३३ | ८६ | ४२२६९ |
| ९ | उच्च व तंत्र शिक्षण विभाग | १७ | ६१५ | ६१५ | ५९१ | २४ | १७ | ३३१२ |
| १० | गृह विभाग | २७ | २३१४ | २३०५ | २२८३ | २२ | ३६ | ४०३४ |
| ११ | गृहनिर्माण विभाग | २७ | ७२७ | ७२० | ६७७ | ४३ | ३४ | १४०९ |
| १२ | उद्योग, उर्जा व कामगार विभाग (उद्योग) | २८ | ३९१ | ३८२ | ३६० | २२ | ३७ | २३६१ |
| १३ | उद्योग, उर्जा व कामगार विभाग (उर्जा) | १ | १२२ | १२३ | १२३ | ० | ० | ६० |
| १४ | उद्योग, उर्जा व कामगार विभाग (कामगार) | २० | १६६ | १७४ | १७३ | १ | १२ | ० |
| १५ | विधी व न्याय विभाग | ६२ | २०१ | २५४ | २१३ | ४१ | ९ | २५९० |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १६ | वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग | १४ | ५३ | ६७ | ६३ | ४ | ० | २४४ |
| १७ | संसदीय कार्य विभाग | ० | ४० | ४० | ३७ | ३ | ० | ० |
| १८ | नियोजन विभाग | १३ | ५९ | ७१ | ६८ | ३ | १ | ८७८ |
| १९ | नियोजन विभाग (रोहयो) | १ | १२४ | १२० | ११७ | ३ | ५ | ११९ |
| २० | सार्वजनिक आरोग्य विभाग | ३८ | ४१५ | ४२१ | ४१८ | ३ | ३२ | ६०८२ |
| २१ | सार्वजनिक बांधकाम विभाग | ३० | ७४१ | ७४६ | ५९५ | १५१ | २५ | १०७०७ |
| २२ | महसुल व वन विभाग (महसूल उपविभाग) | ३९ | १८५१ | १७८० | १७०० | ८० | ११० | १५९५१ |
| २३ | महसुल व वन विभाग (वने) | १० | ३६२ | ३६३ | ३६३ | ० | ९ | ४९०६ |
| २४ | महसूल व वन विभाग (पुनर्वसन) | १० | २६६ | २७२ | २५७ | १५ | ४ | १८७९ |
| २५ | ग्रामविकास व जलसंधारण विभाग (ग्रामविकास व पंचायत राज) | ३५ | ६२१ | ६२५ | ६०९ | १६ | ३१ | ३०३२ |
| २६ | ग्रामविकास व जलसंधारण विभाग (जलसंधारण) | २ | ३५ | ३५ | ३४ | १ | २ | ८ |
| २७ | शालेय शिक्षण व क्रिडा विभाग | ६ | ७३३ | ७२२ | ६७७ | ४५ | १७ | ५०४३ |
| २८ | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग | ६८ | ३०८ | ३६२ | ३६२ | ० | १४ | १७५८ |
| २९ | आदिवासी विकास विभाग | ७ | २७५ | २७८ | २७२ | ६ | ४ | १४०६ |
| ३० | नगर विकास विभाग | ५३ | २२८८ | २३१० | २२८५ | २५ | ३१ | २१७०७ |
| ३१ | जलसंपदा विभाग | ३२ | ५११ | ५२८ | ४६५ | ६३ | १५ | ८०८४ |
| ३२ | पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग | २ | ११८ | ११९ | ११० | ९ | १ | ४६८६ |
| ३३ | महिला व बाल विकास विभाग | ३ | १५६ | १५७ | १५५ | २ | २ | ८९२ |
| ३४ | पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग | ० | ७२ | ६८ | ६८ | ० | ४ | ७८ |
| ३५ | महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय | ३६ | २३२ | २३२ | २१५ | १७ | ३६ | १२४६४ |
| ३६ | अल्पसंख्यांक विकास विभाग | ५ | १६९ | १७१ | १७० | १ | ३ | ४२०० |
| | एकूण | ७१८ | १७७२१ | १७८४३ | १७१२४ | ७१९ | ५९६ | १६१२४८ |

विवरण पत्र क्रमांक - २-ब

जानेवारी २००९ ते डिसेंबर २००९ या कालावधीत संचालनालय / आयुक्तालय तसेच विभागीय स्तरावरील कार्यालयात प्राप्त झालेल्या माहिती अर्जाचा तपशील दर्शविणारे विवरण पत्र

| अ. क्र. | विभागाचे नाव | डिसेंबर २००८ अखेरीस प्रलंबित अर्जाची सुधारित संख्या | अहवालाच्या कालावधीत प्राप्त झालेल्या अर्जाची संख्या | अहवालाच्या कालावधीत निकाली काढलेल्या अर्जाची संख्या | निकाली काढलेल्या अर्जापैकी | | अहवाल कालावधीच्या अखेरीस प्रलंबित अर्जाची संख्या | अहवालाच्या कालावधीत उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीपोटी जमा झालेली रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेल्या अर्जाची संख्या | माहिती नाकारण्यात आलेल्या अर्जाची संख्या | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | कृषि व पदुम विभाग (कृषि उपविभाग) | १७५ | १६९० | १७३२ | १६१७ | ११५ | १३३ | ४४३२३ |
| २ | कृषि व पदुम विभाग (पदुम) | १७४ | ३५५ | ४७८ | ४७६ | २ | ५१ | १७१७५ |
| ३ | सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग | ९२ | २३६५ | २३१५ | २२८३ | ३२ | १४२ | २६७८६ |
| ४ | रोजगार व स्वयंरोजगार विभाग | २४ | ४९८ | ५०५ | ५०४ | १ | १७ | १७३५ |
| ५ | पर्यावरण विभाग | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ६ | वित्त विभाग | १६६ | ३१६७ | ३१४९ | ३११३ | ३६ | १८४ | १८५९५ |
| ७ | अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग | ४५२ | २९३७ | २७८१ | २७३२ | ४९ | ६०८ | ६५४२४ |
| ८ | सामान्य प्रशासन विभाग | ३५ | २५८५ | २४७५ | २३२९ | १४६ | १४५ | २२८८७ |
| ९ | उच्च व तंत्र शिक्षण विभाग | १६४ | ३२२८ | ३२७१ | ३०६० | २११ | १२१ | ३२०१८ |
| १० | गृह विभाग | १०३६८ | २२२६४ | ३०८६६ | २९९२३ | ९४३ | १७६६ | २७६४३९ |
| ११ | गृहनिर्माण विभाग | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| १२ | उद्योग, उर्जा व कामगार विभाग (उद्योग) | २५ | ४८० | ४७६ | ४५० | २६ | २९ | ४४१६ |
| १३ | उद्योग, उर्जा व कामगार विभाग (उर्जा) | ५ | १५७ | १५४ | १५४ | ० | ८ | १८४४ |
| १४ | उद्योग, उर्जा व कामगार विभाग (कामगार) | १९३ | १५१० | १५२८ | १५२२ | ६ | १७५ | २३०४२ |
| १५ | विधी व न्याय विभाग | १९४१ | १४५२ | ३०७८ | २८७४ | २०४ | ३१५ | २६०३५ |
| १६ | वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग | २८० | ४५११ | ४३८३ | ४३५० | ३३ | ४०८ | ७३०३१ |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १७ | संसदीय कार्य विभाग | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| १८ | नियोजन विभाग | १२ | ८० | ८५ | ८१ | ४ | ७ | ५८५ |
| १९ | नियोजन विभाग (रोहयो) | ९ | १०५ | ११४ | ९८ | १६ | ० | १९०९ |
| २० | सार्वजनिक आरोग्य विभाग | १८३ | १६४९ | १६७४ | १६६४ | १० | १५८ | १३९०० |
| २१ | सार्वजनिक बांधकाम विभाग | १३ | ३४७ | ३४९ | २९० | ५९ | ११ | ४०५१ |
| २२ | महसुल व वन विभाग (महसूल उपविभाग) | ८७७ | १७६४९ | १७६७९ | १७३०९ | ३७० | ८४७ | ६७०८१५ |
| २३ | महसुल व वन विभाग (वने) | १४९३ | ५४०२ | ५७०५ | ५४६८ | २३७ | ११९० | १२९४९४ |
| २४ | महसूल व वन विभाग (पुनर्वसन) | २८३० | ५२९५ | ५२५६ | ५१८३ | ७३ | २८६९ | ९५०० |
| २५ | ग्रामविकास व जलसंधारण विभाग (ग्रामविकास व पंचायत राज) | १९ | ४१३ | ४०७ | ३६१ | ४६ | २५ | ३०१९ |
| २६ | ग्रामविकास व जलसंधारण विभाग (जलसंधारण) | ३४ | २१४ | २३७ | २३५ | २ | ११ | ० |
| २७ | शालेय शिक्षण व क्रिडा विभाग | ९७९ | ९७०१ | ९५९४ | ९०३६ | ५५८ | १०८६ | २१७६७७ |
| २८ | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग | २२५ | २८६४ | २८०२ | २७६५ | ३७ | २८७ | ५५६८ |
| २९ | आदिवासी विकास विभाग | १७८ | १२०७ | १२२४ | ९६४ | २६० | १६१ | १६७२८ |
| ३० | नगर विकास विभाग | १२२ | २३४३ | २३९७ | २३२३ | ७४ | ६८ | ५५१२७ |
| ३१ | जलसंपदा विभाग | ८३७ | ८७६१ | ८५८३ | ८२३७ | ३४६ | १०१५ | २७८५२४ |
| ३२ | पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग | ११७६ | ९६० | ९२४ | ८८३ | ४१ | १२१२ | ७८४९ |
| ३३ | महिला व बालविकास विभाग | ३० | ३०८ | ३२७ | ३२७ | ० | ११ | २००० |
| ३४ | पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग | ० | १४८ | १३० | १२७ | ३ | १८ | ४२० |
| ३५ | महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ३६ | अल्पसंख्यांक विकास विभाग | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | **एकूण** | २३१११ | १०४६४५ | ११४६७८ | ११०७३८ | ३९४० | १३०७८ | १८३५५१६ |

## विवरण पत्र क्रमांक - २-क

जिल्हास्तरीय कार्यालयात प्राप्त झालेल्या माहिती अर्जाचे जिल्हावार तपशील दर्शविणारे विवरण पत्र (यात नगरपालिकांची माहिती अंतर्भूत आहे मात्र त्या जिल्यातील महानगरपालिकांची नाही.)

| अ. क्र. | जिल्हा | डिसेंबर २००८ अखेरीस प्रलंबित अर्जाची सुधारित संख्या | अहवालाच्या कालावधीत प्राप्त झालेल्या अर्जाची संख्या | अहवालाच्या कालावधीत निकाली काढलेल्या अर्जाची संख्या | निकाली काढलेल्या अर्जापैकी | | अहवाल कालावधीच्या अखेरीस प्रलंबित अर्जाची संख्या | अहवालाच्या कालावधीत उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीपोटी जमा झालेली रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेल्या अर्जाची संख्या | माहिती नाकारण्यात आलेल्या अर्जाची संख्या | | |
| १ | मुंबई शहर | ६९९ | ७५६२ | ७५०२ | ७३७५ | १२७ | ७५९ | १७७०८६ |
| २ | मुंबई उपनगर | ४०३ | ६११० | ६०२७ | ५९२४ | १०३ | ४८६ | २१८२६७ |
| ३ | ठाणे जिल्हा | १२८३ | १०८८१ | १०९५० | १०८४६ | १०४ | १२१४ | २५६६४५ |
| ४ | रायगड | ५९८ | ५२०१ | ५४१५ | ५३४४ | ७१ | ३८४ | ५७३३५ |
| ५ | रत्नागिरी | ३९९ | ४४४३ | ४४३५ | ४३१३ | १२२ | ४०७ | ६६७८३ |
| ६ | सिंधुदुर्ग | २४० | ३००३ | २९९२ | २८३८ | १५४ | २५१ | ४०९४९ |
| ७ | नाशिक | ६६१ | ६९४६ | ७००८ | ६८१४ | १९४ | ५९९ | ४४१३६ |
| ८ | धुळे | ६४८ | ३८०२ | ४०६८ | ४००२ | ६६ | ३८२ | ४६४६२ |
| ९ | नंदुरबार | २९७ | २८२८ | २८१९ | २७३९ | ८० | ३०६ | ३५९०४ |
| १० | अहमदनगर | ७९२ | ९१८० | ९२८७ | ८९२० | ३६७ | ६८५ | १०३५४९ |
| ११ | जळगाव | ११०५ | १०४४२ | १०४३५ | ९९४३ | ४९२ | १११२ | २३९३२५ |
| १२ | पुणे | १४७३ | ९८३८ | १०४९१ | १०२०८ | २८३ | ८२० | १२५९६१ |
| १३ | सातारा | ३७२ | ४९३३ | ४९०३ | ४१९१ | ७१२ | ४०२ | ७२४७२ |
| १४ | सांगली | २८४ | २२३० | २३५७ | २२६३ | ९४ | १५७ | ३०३५५ |
| १५ | कोल्हापूर | ५२६ | ६५५७ | ६४८० | ६३२४ | १५६ | ६०३ | ७०९२० |
| १६ | सोलापूर | ९०६ | ८२८३ | ८४३२ | ८१९५ | २३७ | ७५७ | ६०२५६ |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १७ | औरंगाबाद | १३८६ | ८२४९ | ८६४३ | ८४२० | २२३ | ९९२ | ८५५४७ |
| १८ | जालना | २१११ | ४९१४ | ६४१५ | ६१९६ | २१९ | ६१० | २२९४२ |
| १९ | परभणी | ६५२ | ३७८७ | ४०२७ | ३९८८ | ३९ | ४१२ | १६११५ |
| २० | हिंगोली | २३६ | १७०९ | १८१२ | १७९० | २२ | १३३ | १०७३९ |
| २१ | नांदेड | ६७६ | ६६४९ | ६४९४ | ६४२१ | ७३ | ८३१ | ५३३६१ |
| २२ | बीड | ३२८ | ४१४६ | ३९८९ | ३९२३ | ६६ | ४८५ | ३२२७२ |
| २३ | लातूर | ३५५ | ३७२७ | ३७७३ | ३७११ | ६२ | ३०९ | ६२५३२ |
| २४ | उस्मानाबाद | ३८० | ३९३२ | ३९२५ | ३७७७ | १४८ | ३८७ | २२७०१ |
| २५ | अमरावती | ९४२ | ९००५ | ९०४५ | ८८४९ | १९६ | ९०२ | ८९४१९ |
| २६ | अकोला | ४६८ | ३९०९ | ३५५४ | ३४८२ | ७२ | ८२३ | ३०६७० |
| २७ | वाशिम | २४३ | २३८९ | २४१६ | २४०६ | १० | २१६ | २६५१५ |
| २८ | बुलढाणा | ४३४ | ६२५४ | ५९५१ | ५८३० | १२१ | ७३७ | ४६०४६ |
| २९ | यवतमाळ . | ६५३ | १०३९३ | १०००७ | ९९७९ | २८ | १०३९ | १३४४६८ |
| ३० | नागपूर | ५९० | ६६४७ | ६६३२ | ६४४३ | १८९ | ६०५ | १०७५४८ |
| ३१ | वर्धा | १८७ | २४०३ | २३७४ | २३४८ | २६ | २१६ | २१५९८ |
| ३२ | चंद्रपूर | ४२२ | ३७३८ | ३८१६ | ३७४३ | ७३ | ३४४ | ५०७५५ |
| ३३ | गडचिरोली | २७२ | १३२८ | १४४९ | १४१४ | ३५ | १५१ | ४०७९८ |
| ३४ | भंडारा | १२८ | १७९९ | १७२९ | १६९७ | ३२ | १९८ | १६७१३ |
| ३५ | गोंदिया | २०४ | १८४६ | १८२५ | १६६५ | १६० | २२५ | २०५०८ |
| | एकूण | २१२२७ | १८७८३० | १९०२०६ | १८५०५१ | ५१५५ | १८८५१ | २५२३१७८ |
| ३६ | वित्त विभाग* | ४३ | ७६३ | ७४६ | ७३५ | ११ | ६० | ५१८५ |
| | एकूण | २१२७० | १८८५९३ | १९०९५२ | १८५७८६ | ५१६६ | १८९११ | २५२८३६३ |

*वित्त विभागाने जिल्हावार माहिती पुरविली नसल्यामुळे त्याविभागाची जिल्हावार एकत्रित माहिती स्वतंत्र दाखविण्यात आली आहे.

## विवरण पत्र क्रमांक - २-ड

जानेवारी २००९ ते डिसेंबर २००९ या कालावधीत महानगर पालिका स्तरावर प्राप्त झालेल्या माहिती अर्जाचा तपशील दर्शविणारे विवरणपत्र

| अ. क्र. | महानगरपालिकेचे नांव | डिसेंबर २००८ अखेरीस प्रलंबित अर्जांची सुधारित संख्या | २००९ या वर्षी प्राप्त झालेल्या अर्जाची संख्या | २००९ या वर्षी निकाली काढलेल्या अर्जाची संख्या | निकाली काढलेल्या अर्जापैकी माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेल्या अर्जाची संख्या | निकाली काढलेल्या अर्जापैकी माहिती नाकारण्यात आलेल्या अर्जाची संख्या | २००९ या वर्ष प्रलंबित अर्जाची संख्या | २००९ या वर्षी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीपोटी जमा झालेली रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | बृहन्मुंबई | ५२२६ | ५९०१८ | ५६५२७ | ५६४३० | ९७ | ७७१७ | ६२९२७३० |
| २ | ठाणे | १२१ | ११४८ | १०३१ | १०२७ | ४ | २३८ | ९५५६ |
| ३ | कल्याण-डोंबिवली | ५९ | २२९७ | २२१३ | २२०३ | १० | १४३ | २६७५८ |
| ४ | नवी मुंबई | १ | २०५८ | १९०६ | १८९६ | १० | १५३ | ११४५७ |
| ५ | उल्हासनगर | १३८ | २०४७ | १९१[illegible] | १९१५ | ० | २७० | ५४२४ |
| ६ | भिंवडी-निजामपूर | ३३१ | ३६५९ | ३७२४ | ३७२४ | ० | २६६ | २२४९० |
| ७ | मिरा-भाईंदर | ६६ | २४५० | २३०१ | २३०१ | ० | २१५ | ६३८४ |
| ८ | नाशिक | ५९ | १७५५ | १६८२ | १६६९ | १३ | १३२ | ५५७४ |
| ९ | मालेगाव | २६ | ९९८ | ९७४ | ९७३ | १ | ५० | ६४०४ |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १० | अहमदनगर | ७० | ११९४ | ११९७ | ११९२ | ५ | ६७ | ४४०२९ |
| ११ | धुळे | ३८ | ५१३ | ५३८ | ५३६ | २ | १३ | ८४६७ |
| १२ | जळगांव | ४४ | ८१९ | ८०६ | ७९४ | १२ | ५७ | ७०६३ |
| १३ | पिंपरी-चिंचवड | ९० | २००६ | २०११ | १९९२ | १९ | ८५ | १८३९५६ |
| १४ | पुणे | ४०४ | ६७९३ | ६७९४ | ६७८० | १४ | ४०३ | ७८१०७ |
| १५ | सांगली-मिरज-कुपवाड शहर | १११ | ८२१ | ७१९ | ७१९ | ० | २१३ | ३३६९ |
| १६ | सोलापूर | ८७ | ८८० | ९२३ | ९१९ | ४ | ४४ | १०२४८ |
| १७ | कोल्हापूर | ५४ | १०२६ | १०१३ | ९८९ | २४ | ६७ | १३०३२ |
| १८ | औरंगाबाद | ४७ | १३२८ | १२७६ | १०८७ | १८९ | ९९ | १३०६७ |
| १९ | नांदेड-वाघाळा | ८३ | ६९२ | ७५२ | ७५२ | ० | २३ | ० |
| २० | अमरावती | ९४ | ३७१ | ४१६ | ४०६ | १० | ४९ | ३३९९ |
| २१ | अकोला | ४०४ | १२०५ | ९३१ | ९३१ | ० | ६७८ | ७३४० |
| २२ | नागपूर | ७९ | १७६० | १७९४ | १७८७ | ७ | ४५ | ४६३४० |
| | एकूण | ७६३२ | ९४८३८ | ९१४४३ | ९१०२२ | ४२१ | ११०२७ | ६८९३१९४ |

विवरण पत्र क्रमांक - २-ई

जानेवारी २००९ ते डिसेंबर २००९ या कालावधीत महामंडळांकडे प्राप्त झालेल्या माहिती अर्जाचा एकत्रित गोषवारा दर्शविणारे विवरण पत्र

| अ. क्र. | विभाग | डिसेंबर २००८ अखेर प्रलंबित अर्जाची सुधारित संख्या | २००९ या वर्षी प्राप्त झालेल्या अर्जाची संख्या | २००९ या वर्षी निकाली काढलेल्या अर्जाची संख्या | निकाली काढलेल्या अर्जापैकी: माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेल्या अर्जाची संख्या | निकाली काढलेल्या अर्जापैकी: माहिती नाकारण्यात आलेल्या अर्जाची संख्या | २००९ या वर्ष अखेरीस प्रलंबित अर्जाची संख्या | २००९ या वर्षी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीपोटी जमा झालेली रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | **कृषि व पदुम विभाग (कृषि उपविभाग)** | | | | | | | |
| | महाराष्ट्र राज्य कृषि उद्योग विकास महामंडळ,मुंबई | १ | ६३ | ५८ | ५६ | २ | ६ | ६८२ |
| | महाराष्ट्र राज्य बियाण महामंडळ, अकोला | ६ | ५६ | ६१ | ६१ | ० | १ | ७०४ |
| | महाराष्ट्र राज्य फलोत्पादन व औषधी वनस्पती मंडळ,पुणे | ० | १५ | १२ | १२ | ० | ३ | ३४० |
| २ | **कृषि व पदुम विभाग (पदुम)** | | | | | | | |
| | शेळी व मेंढी विकास महामंडळ,पुणे | ० | १९ | १९ | १९ | ० | ० | ११० |
| | महाराष्ट्र राज्य सहकारी दुध महासंघ, मुंबई | ० | १६ | १५ | १५ | ० | १ | ३१२ |
| | महाराष्ट्र मत्सोद्योग विकास महामंडळ मर्यादित,मुंबई | ० | २० | १२ | १२ | ० | ८ | ५०० |
| | महाराष्ट्र पशुधन विकास महामंडळ अकोला | ५० | ७ | ५७ | ५७ | ० | ० | ० |
| ३ | **सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग** | | | | | | | |
| | महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ | ० | ६ | ६ | ६ | ० | ० | ० |
| | महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ | ९ | ६२ | ६५ | ६५ | ० | ६ | ५७२८ |
| | महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळ | १ | ३४ | ३४ | २६ | ८ | १ | १३७ |
| | महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ | ० | १४ | १३ | १३ | ० | १ | १८५ |
| | महाराष्ट्र राज्य हौसिंग फायनान्स महामंडळ | २० | १६१ | १५१ | १५१ | ० | ३० | २५१७ |
| | महाराष्ट्र राज्य कृषि पणन महामंडळ | १ | १ | २ | २ | ० | ० | ० |
| | महाराष्ट्र राज्य सहकारी ग्राहक महासंघ | १ | ० | १ | १ | ० | ० | ० |
| | महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ | ३ | ४ | ७ | ७ | ० | ० | ० |
| | महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ | ० | २ | २ | २ | ० | ० | ७१ |
| | महाराष्ट्र सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघ | २५ | ९१ | ११६ | १०५ | ११ | ० | ० |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | **रोजगार व स्वयंरोजगार विभाग** | | | | | | | |
| | अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ | १ | ४ | ४ | ४ | ० | १ | ० |
| ५ | **पर्यावरण विभाग** | | | | | | | |
| | महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ | ६४ | ७२२ | ७०२ | ७०१ | १ | ८४ | १३५९९ |
| ६ | **सामान्य प्रशासन विभाग** | | | | | | | |
| | **महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ मर्यादीत, पुणे** | ० | ७ | ७ | ६ | १ | ० | ० |
| ७ | **गृह विभाग** | | | | | | | |
| | महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ | ० | १४ | १४ | १४ | ० | ० | ० |
| | महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ | २२१ | २७७७ | २८१२ | २७३२ | ८० | १९४ | ३११५२ |
| ८ | **गृहनिर्माण विभाग** | १८१७ | १०८११ | १०९३३ | १०५९८ | ३३५ | १६९५ | ३८८८८१ |
| ९ | **उद्योग, उर्जा व कामगार विभाग (उद्योग)** | | | | | | | |
| | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई | १२० | १४८८ | १५०७ | १५०० | ७ | १०१ | ५७०९२ |
| | महाराष्ट्र राज्य, वित्तीय महामंडळ, मुंबई | ८ | ७३ | ७८ | ७८ | ० | ३ | २६२० |
| | महाराष्ट्र पेट्रोकेमिकल्स महामंडळ, मर्या.मुंबई | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई | ० | ४६ | ४३ | ४२ | १ | ३ | ११७५ |
| | कोकण विकास महामंडळ मर्या.,मुंबई | ० | १३ | १३ | १३ | ० | ० | ० |
| | पश्चिम विकास महामंडळ, मर्या. पुणे | ५ | २१ | २६ | २६ | ० | ० | १४५१ |
| | मराठवाडा विकास महामंडळ, मर्या.औरंगाबाद | ५ | १७ | २० | २० | ० | २ | ० |
| | विदर्भ विकास महामंडळ मर्या.नागपूर. | ० | २ | २ | २ | ० | ० | ० |
| | महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ, नागपूर | ० | २८ | २८ | २८ | ० | ० | २३१४ |
| | महाराष्ट्र राज्य लघु उद्योग विकास महामंडळ | ५ | १५० | १५१ | १४८ | ३ | ४ | १०८२ |
| | महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिकी महामंडळ, मर्या.मुंबई | ० | ६ | ६ | ६ | ० | ० | ० |
| १० | **उद्योग, उर्जा व कामगार विभाग (उर्जा)** | | | | | | | |
| | महाराष्ट्र राज्य विद्युत धारक कंपनी लि., मुंबई | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कं.लि.,मुंबई | ३७ | ३८८ | ३७२ | ३६७ | ५ | ५३ | ८६१३ |
| | महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कं.लि.मुंबई | ९ | २७८ | २५० | २४३ | ७ | ३७ | ४८६८ |
| | महाराष्ट्र राज्य, विद्युत वितरण कं.लि.मुंबई | ७३५ | ६२१६ | ६१७० | ६१४७ | २३ | ८६१ | २९६०६ |
| | महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण मुंबई | ५ | ५१ | ५१ | ५१ | ० | ५ | ३५३ |
| | महाराष्ट्र राज्य ऊर्जा नियामक आयोग, मुंबई | ६ | १०३ | ९५ | ९५ | ० | १४ | ० |

विवरण पत्र क्रमांक - २-ई-----(चालू )

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ११ | **सार्वजनिक बांधकाम विभाग** | | | | | | | |
| | **महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ** | १३ | २८२ | २७० | २४० | ३० | २५ | १९९२२ |
| १२ | **महसुल व वन विभाग (महसूल )** | | | | | | | |
| | महाराष्ट्र शेती महामंडळ,पुणे | ० | २७ | २७ | २७ | ० | ० | २४५ |
| १३ | **महसुल व वन विभाग (वने)** | | | | | | | |
| | **वनविकास महामंडळ,महाराष्ट्र राज्य, नागपूर** | ३३ | १९७ | २१० | १९१ | १९ | २० | ६०८७ |
| १४ | **ग्रामविकास व जलसंधारण विभाग (जलसंधारण)** | ० | ८ | ८ | ८ | ० | ० | ० |
| १५ | **सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग** | | | | | | | |
| | महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ | १९ | १३८ | १३६ | १३५ | १ | २१ | १२४ |
| | लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ | ३ | २८ | ३१ | ३१ | ० | ० | १३६४ |
| | वसंतराव नाईक विमुक्त-जाती भटक्या जमाती विकास महामंडळ | २ | १६ | १८ | १ | १ | ० | ० |
| | संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ | ७ | ५२ | ५२ | ५२ | ० | ७ | ४९२ |
| | महाराष्ट्र राज्य व इतर मागासवर्ग व वित्त विकास महामंडळ | १५ | ८७ | ९५ | ८२ | १३ | ७ | ८५७ |
| | अपंग वित्त विकास महामंडळ | २ | ३२ | ३४ | ३४ | ० | ० | ० |
| १६ | **आदिवासी विकास विभाग** | | | | | | | |
| | आदिवासी विकास महामंडळ, नाशिक | १५ | ७६ | ८० | ८० | ० | ११ | ५३ |
| १७ | **नगर विकास विभाग** | | | | | | | |
| | सिडको | ११९ | ३०६१ | २९२५ | २९१६ | १ | २६३ | १७२४३८ |
| | एमएमआरडीए | ५८२ | १७३१ | २२५४ | २२५४ | ० | ५१ | २१०४० |
| | पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण | १२ | ३०२ | ३१४ | ३१४ | ० | ० | ११२८३ |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १८ | **जलसंपदा विभाग** | | | | | | | |
| | महाराष्ट्र कृष्णा खोरे पाटबंधारे विकास महामंडळ, पुणे | ० | ६५ | ६५ | ६५ | ० | ० | १०६६ |
| | विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर | ५ | ४१ | ४५ | ४३ | २ | १ | ३४०८ |
| | गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद | ० | ७६ | ६६ | ६६ | ० | १० | ५९० |
| | तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव | २२ | ४८४ | ४६३ | ४६१ | २ | ४३ | ११५३० |
| | कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे | ५४ | ५०४ | ५१३ | ४९२ | २१ | ४५ | ९५२५ |
| १९ | **पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग** | | | | | | | |
| | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण | १०६ | ७५० | ७३७ | ७०१ | ३६ | १११ | ५५७३ |
| २० | **महिला व बालविकास विभाग** | | | | | | | |
| | **महिला आर्थिक विकास महामंडळ, मुंबई.** | ० | ३६ | ३५ | ३५ | ० | १ | ३२५ |
| २१ | **पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग** | | | | | | | |
| | महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळ,मुंबई | १९ | ७१ | ८७ | ८७ | ० | ३ | २१४० |
| | महाराष्ट्र रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ,गोरेगाव,मुंबई | ० | २३ | २३ | २३ | ० | ० | ११६ |
| | अल्पसंख्यांक विकास विभाग | | | | | | | |
| | मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ | ० | १२१ | १०९ | १०९ | ० | १२ | ० |
| | महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ | ० | ९०० | ५५० | ५५० | ० | ३५० | १२००० |
| | **एकूण** | ४१९१ | ३२९८२ | ३३०६२ | ३२४३६ | ६२६ | ४१११ | ८५१३२६ |

## विवरण पत्र क्रमांक - ३

### जानेवारी २००९ ते डिसेंबर २००९ या कालावधीत प्राप्त झालेल्या प्रथम अपिलांचा एकत्रित गोषवारा दर्शविणारे विवरण पत्र

| अ. क्र. | विभाग | डिसेंबर २००८ अखेर प्रलंबित अपिलांची सुधारित संख्या | अहवालाच्या कालावधीत प्राप्त झालेल्या अपिलांची संख्या | अहवालाच्या कालावधीत निकाली काढलेल्या अपिलांची संख्या | निकाली काढलेल्या अपिलांपैकी मान्य केलेल्या अपिलांची संख्या | निकाली काढलेल्या अपिलांपैकी नाकारण्यात आलेल्या अपिलांची संख्या | अहवाल कालावधीच्या अखेरीस प्रलंबित अपिलांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | कृषि व पदुम विभाग (कृषि उपविभाग) | ७९३ | ८३२ | १५१२ | १४३० | ८२ | ११३ |
| २ | कृषि व पदुम विभाग (पदुम) | १६ | १७५ | १८३ | १८३ | ० | ८ |
| ३ | सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग | २०३ | २५८५ | २६१२ | १९५२ | ६६० | १७६ |
| ४ | रोजगार व स्वयंरोजगार विभाग | १ | २८ | २५ | १० | १५ | ४ |
| ५ | पर्यावरण विभाग | ४ | २ | २ | २ | ० | ४ |
| ६ | वित्त विभाग | २१ | २५६ | २४२ | १७५ | ६७ | ३५ |
| ७ | अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग | ३७ | १७४ | १८२ | १६९ | १३ | २९ |
| ८ | सामान्य प्रशासन विभाग | २ | ३१३ | २९९ | ११५ | १८४ | १६ |
| ९ | उच्च व तंत्र शिक्षण विभाग | ४८ | १०३९ | ९८२ | ६७३ | ३०९ | १०५ |
| १० | गृह विभाग | ११३२ | २८९७ | २९३१ | २०६६ | ८६५ | १०९८ |
| ११ | गृहनिर्माण विभाग | ८९ | ६७६ | ७३४ | ७०८ | २६ | ३१ |
| १२ | उद्योग, उर्जा व कामगार विभाग (उद्योग) | ८ | १६७ | १६५ | १५५ | १० | १० |
| १३ | उद्योग, उर्जा व कामगार विभाग (उर्जा) | १०२ | ८३६ | ७८४ | ७६३ | २१ | १५४ |
| १४ | उद्योग, उर्जा व कामगार विभाग (कामगार) | २१ | १६६ | १६४ | १३५ | २९ | २३ |
| १५ | विधी व न्याय विभाग | ३८९ | २३४ | ५४५ | ४४२ | १०३ | ५८ |
| १६ | वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग | २३ | २६८ | २४९ | २३४ | १५ | ४२ |
| १७ | संसदीय कार्य विभाग | ० | १ | १ | ० | १ | ० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १८ | नियोजन विभाग | १ | १४ | १५ | ४ | ११ | ० |
| १९ | नियोजन विभाग (रोहयो) | ० | ३३ | ३२ | ३१ | १ | १ |
| २० | सार्वजनिक आरोग्य विभाग | ४८ | २४४ | २६३ | २५८ | ५ | २९ |
